Registered No. 4—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ | अकोला, रविवार ता० १२ अक्टोबर सन १८७३ इ० | अंक ४१


## जाहिरात.
### वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डाकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १८ |
| अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१८६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| " दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.
### स्त्रीगीतसंग्रह भाग २ रा.

पहिल्या भागाप्रमाणेंच ह्यांत स्त्रियांच्या ह्मणण्यांत येणारीं प्रसिद्ध व मनोरंजक अशीं देवादिकांच्या रसाळ कथेचीं वगैरे गाणीं असून चित्तरंजनार्थ शेवटीं उखाणे ही आहेत. गाण्याचा भावार्थ, कठीण शद्बांवर टीपा इत्यादि दिल्या आहेत. फक्त जास्ती मिळून समयविशेषीं गाण्यांच्या चाली वरतीं दर्शविल्या आहेत. किंमत आणे ६ सहा.

ज्यास हें पुस्तक घेणें असेल त्याणीं खालीं सही करणाराकडेस डांकहशीलासुद्धा किंमत आणे ८ आठ पाठविली असतां पुस्तक रवाना करण्यांत येईल.

महादेव गोपाळ पटवर्धन,
क्लार्क निसबत जनरल ट्राफिक म्यानेजर. जी. ऐ. पी. रेल्वे मुंबई बोरीबंदर.

मुंबई, गणेशवाडी.

### स्त्रीगीतसंग्रह. भाग १ ला

किंमत आणे सात.

सदर्हू पुस्तक ज्यांस घेणें असेल त्यांणीं वर लिहिलेले पत्यावर डांकहशीलासुद्धां किंमत आणे ९ पाठविल्यास पुस्तक रवाना करण्यांत येईल.


## नोटिस

नोटिस—अर्जुन वलद जानजी व लक्ष्मी मर्द जानजी पाटील राहणार लाखणवाडे तालुके बाळापुर यांस नोटिस देणार शिवबक्ष गणेशदास साहू दुकान मजकूर. तुह्मी तारिख १६ सेप्टेंबर सन १८७३ इसवीची नोटिस दिली ती तारिख २६ सेप्टेंबर सन १८७३ इसवी रोजीं पावली. तुह्मी ह्मणता कीं, आह्मास भुलथाप देऊन सालबंदीचा दस्तैवज लिहून घेतला आणि घर व शेत घेऊन आह्मास रुपये देण्याचें कबूल केलें ते दिले नाहींत. परंतु हा मजकूर तुमचा खरा नाहीं. आम्ही तुह्मावर ४०९ रुपयांचे दस्तैवजावरून फिर्याद स्माल काज कोर्टांत केल्यावरून तुह्मी आमची आपसांत चवघा अनुमतें समजूत करून रुपये २०० चा सालबंदीचा दस्तैवज नवीन लिहून देऊन दुसरे रुपये २००शाकारितां तुह्मी आपले घर व शेत असे आह्मास खरिदी दिलें आणि याजबद्दल रुपये मागील देण्यांत भरून पावलो ह्मणून तुह्मी मजला पावतीही दिली आहे. असें असोन हल्लीं तुह्मी विनाकारण दुसऱ्याचे नादीं लागून नोटिस दिली हे व्यर्थ आहे. आम्ही तुह्मास नगदी पैसा देण्याचें कबूल केलें नसोन तुह्मास नगदी पैसा आह्मास देण्याचें काहीं कारणही नाहीं. तुह्मी उगीच खोटी सबब नोटिशींत लिहिली ही बिलकूल बरोबर नाहीं. दस्तैवजांत व पावतींत साफ मजकूर लिहिला आहे कीं, मागील देण्याबदल हे रुपये आहेत नगदी रुपयांचा त्यांत जिकर बिलकुल नाहीं. व नगदी पैसा देऊन सालबंदीचा दस्तैवज कोणीच घेतही नाहीं हें उघड सर्वांस माहित आहे. आतां इतकें तुह्मास कळविण्यांत येतें कीं तुह्मी करार केल्याप्रमाणें या नोटिशीचे तारखेपासून पंधरा दिवसांत घर खालीं करून द्यावें आणि शेताचे खातें आमचे नावें करून द्यावें असें न केल्यास आम्ही तुह्मांवर फिर्याद करून घराचें भाडें दर महा रुपये ५ प्रमाणें भरून घेऊ व घर खालीं करून घेऊन शेतांचे खातेंही आम्ही आपले नावें करून घेऊ या नोटिशीचे खर्चासुद्धां सर्व खर्च तुह्मास द्यावा लागेल. तारिख ९ सेप्टेंबर सन १८७३ इसवी.

(सही) शिवबक्ष गणेशदास साहू
दुकान लाखणवाडे.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.

वि. वि. आपणाकडेस ह्या खालीं लिहिलेल्या च्यार ओळी पाठविल्या आहेत त्यांस आपण आपल्या सुंदर पत्रीं जागा देऊन प्रसिद्ध कराल अशी आशा आहे.

पातुर्डा हा गाव कसब्याचा असून या गावांत सुमारें ८ | ९ शें घरें आहेत. हा गाव अकोटचे व आडगावचे रस्त्यावरचा असल्या कारणानें या गावांत साहेबलोकांचेही बरेच मुकाम होतात तहशिलदार तर हर हमेशा आठपंधरा दिवसांनीं येतच असतात व दुसरेही सरकारी अधिकारी चीफ वगैरे येतात. पत्रकर्ते राव हें तर सर्व बरेंच आहे परंतु एक मोठें दुःख वाटतें कीं या गावांतील नदीस रंगाटीवरून जाणें ह्मटलें ह्मणजे नाकास पदर लाऊनच गेलें पाहिजे. राव तेथें तुम्ही ह्मणाल कीं पाय ठेवण्यास तरी चांगली जागा असेल तर मुळीच नाहीं जिकडे तिकडे मैला केलेला आढळतो या योगानें पाणी नेणारास फारच त्रास भोगावा लागतो. इकडे जर आमचे एथील देशमुख लक्ष देतील तर फार चांगली गोष्ट आहे. याचे योगानें लोकांस स्वच्छपणें पाणी प्यावयास ही मिळेल व गावासही सुखकारक होईल.

या गावांतील लोकांनीं येथें म्युनसिपल कमिटी होण्याविषयीं बरेच दिवस झाले अर्ज केले ह्मणोन एकितों परंतु अद्याप तर कांहींच ठिकाण नाहीं या उपर मग तिचा जन्म कधीं होईल तो होवो.

इकडे परजन्यानें तर बरीच गर्दी करून दिली आहे सदोदित मेघराजाची स्वारी येत असते. इकडे पिके आतां बरीच चांगलीं जोरावर आहेत. रोगराई बिलकूल कांहीं नाहीं.

या वरील चार ओळीस आपण जागा दिल्यास पुढें सदोदित बातम्या कळविण्यास उत्तेजन येईल कळावें.

मुक्काम पातुर्डे ता० जळगाव तारीख ९ माहे अक्टोबर सन १८७३ इ०

एक मुशाफर.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. तारीख १७ आगष्टच्या वऱ्हाडसमाचाराच्या अंकांत ५६ देशांची प्राचीन व नवीन नांवें दिली आहेत हें करणारानें फार चांगलें केलें पण त्यानें दिलेल्या संस्कृत व मराठी नांवास आधार कोणते घेतले हे मुळींच लिहिलें नाहीं. तें लिहिणें जरूर आहे यास्तव अजून तरी तें आधार दाखवावे यात १५ वा (१६ वा नव्हे) देश मुळींच दिला नाहीं, तोही जरूर द्यावा. ही माहिती चांगली व उपयुक्त असल्यामुळें बहुत पत्रकर्त्यांनीं ती आपल्या पत्रीं उतरून घेतली आहे. त्यांतील कितीएक नावां विषयीं संशय आहे तो मूळ याद देणाऱ्यांनीं आधार दिला ह्मणजे लिहून कळवीन. मुंबई तारीख ५ सप्टेंबर सन १८७३ इसवी.

एक प्राचीन माहितीचा
शोकी.

### खरें हिंदुस्थानचे हित.

ज्ञानप्रकाशकर्ते यांस.

वि. वि. आम्ही सर्व लोकांस आपल्या द्वारें कळवितों कीं, हल्लीं पुण्यांत आम्ही एक साबण तयार करण्याचा कारखाना काढला आहे. हा साबण आह्मी केवळ शुक्रनीति नामक गीर्वाण भाषेंत ग्रंथ आहे त्याचे आधारानें तयार केला आहे. ह्या साबणांत चरबीचा उपयोग बिलकुल नसून ह्यांतील सर्व पदार्थ आपल्या देशांत उत्पन्न होणारे आहेत. अनुभवाअंतीं असें दिसून येईल कीं, ह्यांत खरूज आगपैणें इत्यादि नाश करणारे औषधीगुणही फार चांगले आहेत. ह्याचा उपयोग अंग धुण्यास केला असतां अंग स्वच्छ होऊन मृदु पडतें. शाई इत्यादि पदार्थांचे पडलेले डाग निघून जातात. व हा अगदी सोवळ्यांत घेण्याजोगा आहे. अशा प्रकारचा हा साबण प्रचारांत लवकर आणून देशाचें खरें हित पाहण्याचें असेल तर अशा काळीं स्वदेशहितेच्छु लोक आमची उमेद खचूं देणार नाहींत अशी आमची पूर्ण खात्री आहे. व्यापार संबधीं माहिती बुधवार पेठेंत गवताच्या मारुतीजवळ रा. रा. कोंडो अमृत यांचे वाड्यांत अगर आम्हा पैकीं कोणा एकास भेटल्यास मिळेल. ह्या आमच्या सूचनेचा धिक्कार न करितां आपण आम्हाकरितां तसदी घेऊन जर, सर्व लोकांस ह्या आमच्या हिंदुस्थानी पदार्थाकडे प्रीतियुक्त पहावयास लावाल तर आपण खरें देशहित केल्यासारखें होईल.

इतर देशकल्याण करूं इच्छिणारे वर्तमानपत्रकर्ते आपले पत्रांतून ह्या पत्राचे उतारे घेऊन आह्मास मदत करतीलच करतील असें मानण्यास पूर्ण आशा आहे. व ह्याच प्रकारचे दुसरे हिंदुस्थानी पदार्थ करण्यास आम्हास पुष्कळ उमेद येईल कळावें.

पुणें तारीख २० सप्टेंबर १८७३ इ०

कलाशास्त्रोत्तेजक समूह
रघुनाथ शास्त्री गोखले.
नारायण रावजी साठे.
रा० के० लिमये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यास. —

वि. वि. खालीं लिहिलेल्या च्यार ओळी आपण आपले जगमान्य पत्राच्या येत्या अंकीं छापून प्रसिध्द कराल अशी आशा आहे.

पत्रकर्ते महाराज मी आपणास विसरलो असें नाहीं. कारण आपण मजला वेळचे वेळेस आश्रय देता तेव्हां कसा विसरेन. अस्तु. महाराज, मी तूर्त आपणास वऱ्हाड प्रांतांतील तालुके कचेरींतील उमेदवारावर सरकारची कितपत नजर आहे. हें कळवितो येथील कचेरींतील एका कारकुनास पेनशन मिळालें असें ऐकतों. व त्याची खाली झालेली जागा यथान्याय हुशार व सर्व कामांत वहिवाटलेल्या उमेदवारास मिळावी अगर वर्गावर्गी होऊन शेवटची जागा तरी उमेदवारास मिळावी. तसें न होतां हुजुरांतील एक नवीनच उमेदवार कायम झाला असें ऐकून येथील सर्व उमेदवार हवालदील होऊन गेले आहेत. एडिटरराव ज्यांनीं या कचेरींत आज सुमारें आठ आठ दहा दहा वर्षें उमेदवारी केली आहे. व सर्व कामांत हुशार असोन त्याचे लायकीबद्दल व हुशारीबद्दल त्यांजवळ वरिष्ठ अधिकाऱ्यांचीं सर्टिफिकिटें असून त्यांची व्यवस्था अशी होऊन हुजुरांतील दोन तीन महिने उमेदवारी करणारास एकदम जागा द्यावी हें हुजुरांतील वरिष्ठ अधिकाऱ्यास कसें योग्य वाटलें असेल ते असो. यावरून हुजुरांतील उमेदवारच काय ते भरती होणार तेव्हां या गरीब उमेदवारांनीं काय करावें? याजबद्दल आपण मेहेरबानीनें वऱ्हाड रिपोर्टर यांचे कानावर हा मजकूर घालून या गरीब उमेदवारांची व याच प्रमाणें सर्व तालुके कचेरींतील उमेदवारांच्या हक्काविषयीं का[illegible] लागेल अशी तजवीज कराल

केल्यास देशांतील लोक नानाप्रकारचे उद्योग करूं लागतील आणि देशांतील संपत्ति वाढून लोक आबाद होतील. आमच्या देशांतील खनिज पदार्थांचा उपयोग होऊन यंत्रें वगैरे तयार होऊं लागल्यास आमचे लोक चांगल्या स्थितींत येण्यास फार दिवस लागणार नाहींत. वृ. धा.

निरुपयोगी, जुलमी व अन्यायमूलक असे कायदे होऊं लागल्यानें पूनाअबझर्वरानें कायदे कौंसिलास जे दोष दिले आहेत ते बहुतेक अगदीं रास्त असून त्या त्या ह्मणण्याप्रमाणें विलायत सरकारानें ही मंडळीच मोडून टाकावी हें रास्त आहे. ज्या मंडळींत असे अप्रयोजक कायदे होतात ती मंडळी चांगली नाहीं असें ह्मणणें साहजीक असून त्याबद्दल दोष देणें अवश्य आहे.

पृथ्वींत एकंदर १,३०,००,००,००० लोकांची वस्ती असून दरसाल ३,३०,००,००० अगर दररोज ९०,००० अगर दर मिनिटास ६० मरतात असें एक पत्रकर्ता ह्मणतो. अ. द.

## मुंबईचे कायदेकौन्सल.

मिठाचे बंदोबस्ताविषयींचे कायद्याच्या मसुद्याचे विचार करण्याविषयीं राजर्स, केनेडी, अंडरसन, जगशेटजी जिजीभाई व नारायणराव वासुदेव या गृहस्थांची सिलेक्ट कमिटी नेमली होती. त्यांनीं या मसुद्याविषयीं जो रिपोर्ट केला तो २६ वे तारखेचे सरकारी ग्याझिटांत छापून प्रसिद्ध झाला आहे. त्यांत तिघे साहेब लोकांचें मत एक आहे व दोघे नेटिवांचें मत एक आहे. या सालीं कायदे करणारे कौन्सलापुढें जे कायद्याचे मसुदे आले आहेत ते फार महत्वाचे असून लोकांवर फार जुलूम होण्यासारखे आहेत. त्याविषयीं पुष्कळ विचार होऊन नंतर ते पास व्हावेत असें लोकांस वाटत होतें पण सरकारी मेंबरांनीं बहुत करून तसें होऊं देण्याचा प्रसंग येऊं दिला नाहीं. त्यांस कायदे पास करण्याची इतकी घाई सुटली आहे कीं, मसुदा वाचल्या दिवसापासून बहुत करून एक महिन्याचे आंत सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट होऊन नंतर लवकरच कायदा पसार होतो. यामुळें कायद्याच्या मसुद्याचें भाषांतर होऊन तें वाचून त्यांचा विचार करण्यास लोकांस फुरसत मुळींच मिळत नाहीं. बरें कदाचित कोणी लोकांनीं मेहेनत करून भाषांतर प्रसिद्ध होतांच मसुद्यांतील कलमांचा विच्यार करून अर्ज तयार करून लोक पाठवितील तर त्यांत एक मोठी अडचण कौन्सलानें आणून ठेविली आहे ती अशी कीं, अर्जाचे भषांतर इंग्रजींत करून तें अर्जाबरोबर पाठविलें पाहिजे. आतां लोकांस इंग्रजी भाषांतर करून घेण्यास किती अडचणी आहत याचा विचार केला असतां त्यां कौन्सलांतील मेंबर लोकांस माहित असतील यांत संशय नाहीं. असें असूनही हे लोक कायदे पसार करण्यास इतकी घाई करतात यावरून लोकांचें मत समजण्यास या कौन्सलचें लोकांस किती काळजी आहे हें उघड दिसून येतें.

या सालीं फार महत्वाचे कायद्याचे मसुदे कौन्सलापुढें असून ते सर्व पास होतील यांत कोणासही शंका नाहीं. कारण कौंसलांत पुष्कळ सरकारी नौकर असल्यामुळें व बाहेरील लोकांची संख्या कमी असल्यामुळें जे पाहिजे ते मसुदे बहुसंमतानें पास होण्यास यत्किंचितही अडचण पडत नाहीं. सर्व सरकारी नौकरांचें मत एक असतें व बाहेरील सर्व लोकांचें मत एकसारखें असण्याचा संभव फार कमी आहे तरी तें बहुतकरून एक असतें व अडवोकेट जनरल यांचेंही मत बहुतकरून नेटिव मेंबरांसारखेंच असतें. या सालांत नेटिव मेंबर होयभरू नाहींत. साहेब लोकांस न भितां त्यांस जें बरें वाटतें ते मत नेटिव मेंबर निर्भयपणें देतात, ही गोष्ट एक लोकांनीं मोठी आनंदाची समजली पाहिजे. कारण असें निर्भयपणें मोठमोठे साहेबांविरुद्ध मत देणारे नेटिवही विरळेच निघणार. नेटिव मेंबर आपलें काम बरोबर बजावित नाहींत असें त्यांस कोणी बोलूं सकणार नाहीं. आतां त्यांचे हातून कांहीं होऊं शकत नाहीं ही गोष्ट निराळी आहे. हल्लीं ज्याप्रमाणें कौन्सलाची रचना आहे त्या स्थितींत बाहेरचे मेंबराचे हातून कांहीं एक होऊं सकत नाही हे साधारण मनुष्याचेंही सहज लक्षांत येईल. तथापि नेटिव मेंबर व अडवोकेट जनरल हे लोकाचे तर्फेनें निर्भिडपणें बोलतात याकरितां आह्मी त्यांचे फार आभारी आहो.

आह्मास वाटतें कीं, कायदे करणारे कौन्सलांत सरकारी नौकरांशिवाय बाहेरील लोक घेण्याचा उद्देश इतकाच दिसतो कीं, विलायतेंतील लोकांस समजावें कीं, आह्मी हिंदुस्थाना करतां जे कायदे करतो ते त्या देशांतील लोकांस कौन्सलांत घेऊन त्यांचे संमतीनें करतो. तेव्हां हिंदुस्थानांत होणारे कायदे पार्लमेंट सभेंतील कायद्याप्रमाणें लोकांचे मतानेंच होतात. अशी विलायतेंतील लोकांचे डोळ्यांत माती टाकण्याकरितां बाहेरील लोक कौन्सलांत घेतले असावेत यांत तिळप्राय शंका नाहीं. कारण त्या लोकांपासून कायदे करण्यास खरोखर उपयोग व्हावा व ज्या नेटिव लोकांसाठी कायदे करावयाचे त्यांचें मत समजावें व त्यांचे मतास अनुसरून कायदे व्हावे असा सरकारचा खरा उद्देश असता तर निदान सरकारी नौकरा इतके तरी बाहेरचे लोक कौन्सलांत नेमिले असते. आजपर्यंत कौन्सलांत ज्या नेटिव लोकांची नेमणूक झाली त्यापासून कायदे पसार होण्यास फारशी हरकत आली नाहीं. पुष्कळांस इंग्रजी भाषेंच ज्ञान नव्हतें व साहेब जे ह्मणतील त्यास होयला होय लावून दिलें कीं झालें. आह्मास वाटतें इंग्रजी जाणणारे लोकांची नेमणूक कौन्सलांत केली ही सरकारानें एक मोठी चूकच केली आहे. पहिल्या प्रमाणें सरदार लोकांच्या नेमणुका केल्या असत्या ह्मणजे कोणतेही गोष्टींत मतभेद पडण्याची फारशी भीति नव्हती. बरें झाली गोष्ट ती झाली आतां एथून पुढें तरी सावध रहावें व इंग्रजी शिकलेले लोकांस कौन्सलांत येऊं देऊं नये.

हल्लींही कित्येक कायदे सरकारी नौकर हट्टानें पसार करतात असा लोकांचा समज झाला आहे व तो पुष्कळ अंशीं खरा आहे असें आह्मास वाटतें. स्मशानभूमीचे कायद्याविषयीं लोकांकडून पुष्कळ अर्ज गेले कीं, ह्या कायद्याची जरूर नाहीं व हा कायदा पास झाल्यापासून गावोगावचे लोकांस निरर्थक त्रास होणार आहे व या कायद्याचा विचार करण्यासाठीं जी सिलेक्ट कमिटी नेमिली तींतील नेटिव लोकांचें मतही असेंच होतें व आनरेबल गिब्ज साहेबांचें मतही असें होतें कीं म्युनिसिपल कामिटीचे कायद्याचे मसुद्यांत स्मशानभूमींविषयीं जीं कलमें घातलीं आहेत तीं बरीं आहेत त्याविषयीं नवे कायद्याची गरज नाहीं. यावरून सर्व लोकांची आशा होती कीं हा कायदा पास व्हवयाचा नाहीं पण तिसऱ्यानें वाचण्याचा वेळ आला तेव्हां सर्व सरकारी नौकर एक झाले. आनरेबल गिब्ज साहेबांवर सर्व बाहेरील लोकांची मदार होती तेही फिरले. त्यांचें मतही सरकारी कामदाराचे मतास मिळालें. आनरेबल नारायण वासुदेव यानीं त्यांस त्यांचे पूर्वींचे मताचें स्मरण दिलें पण त्यांनीं सांगितलें कीं पहिल्यानें आमचें मत तसें होतें खरें पण अधिक विचार केल्यावर आमचें पहिलें मत बदलून असा कायदा असावा असें आह्मांस वाटूं लागलें. आनरेबल गिब्ज साहेबांचें विचारानें मत बदललें पण गरीब रयतेच्या गळयांस त्यामुळें सुरी लागली. या गोष्टीवरून नेटिव लोकांचें न चालावें ह्मणून सर्व कामगार लोक एकत्र होऊन तो कायदा पसार केला अशी जी लोकांची समजूत झाली आहे ती सर्वथैव खोटी नाहीं असें आह्मास वाटतें. असो असे विचार हल्लीं जे कायदे पसार करण्याच्या तजविजी सरकारी कामदारांनीं चालविल्या आहेत त्यावरून मनांत येतात.

मिठाचे बिलाविषयीं सिलेक्ट कमिटीनें जो रपोट केला आहे त्यांत पहिले बिलापेक्षां फारसा फेरफार केला नाहीं. ह्मणण्यासारखे दोन तीन ठराव फिरविले आहेत. पहिले मसुद्याचे बिसावे कलमांत लिहिलें होतें कीं मिठागरवाल्यांनीं नोकरांची याद तयार करून ती मिठाचे कलेक्टराकडे दरवर्षीं पाठवित जावी व त्यास जे नौकर काढून टाकावेसे वाटतील त्यांचीं नावें कलेक्टर साहेब काढून टाकतील व नांवें कां काढलीं याचें कारण सांगणार नाहींत. सिलेक्ट कमिटीस वाटलें कीं ही गोष्ट फार सक्तीची आहे व इतकी सक्ती करण्याची जरूर नाहीं. तेव्हां त्यांनीं इतकेंच ठरविलें कीं दरवर्षीं आपण जे नौकर लोक मिठागरांत कामावर लावणार त्यांची याद करून कलेक्टर साहेबांकडें पाठवावी ह्मणजे झालें. दुसरें जा जा ठिकाणीं सरकारचे परवानगीशिवाय मीठ उत्पन्न करित असतील तेथील जमीनदार आणि शेतकरी लोक यांनीं त्या गोष्टीची खबर मिठावरचे सरकारी कामदारांस न दिल्यास तो फौजदारी गुन्हा समजून त्यांस शिक्षा व्हावी ह्मणून लिहिलें होतें तें काढून टाकून फक्त पाटील कुळकर्णी वगैरे सरकारी नौकरांस मात्र ही गोष्ट लागू ठेविली आहे. तिसरें मिठागरांतील कोणतेही नौकरानें गुन्हा केला असता मिठागरवाल्यानेंच तो गुन्हा केलासें समजलें जाईल असें पूर्वींचे मसुद्यांत होतें त्यांत कमिटीनें इतकाच फेर केला कीं मिठागरवाल्यानें सरकारी अमलदाराची इतकी खात्री करून द्यावी कीं जितके इलाज करावयाचे तितके इलाज मी केले होते ह्मणजे मग त्यावर टपका कांहीं नाहीं. ही गोष्ट अधिकाऱ्याचें समाधान होण्यासारखी शाबिद करून देणें फार कठीण आहे तरी हा एक येवढा ह्मणण्यासारखा फेर केला आहे.

घरांत लोकांनीं वीस शेरापेक्षां अधिक मीठ ठेवूं नये येथें मात्र युरोपियन मेंबरांची अक्कल गुंग झाली. त्यांस समजेना कीं, असें केल्यापासून नेटिव लोकांस गैरसोय काय होणार. आह्मास वाठतें कीं, हिंदुस्थानचे उत्पन्नांतून इतका पैसा खर्च करून व देशभाषा शिकण्याकरितां इनामें देऊन सरकारीनोकरांस देशांतील लोकांची अधिक माहिती व्हावी ह्मणून सरकार जो प्रयत्न करतें तो सर्व व्यर्थ जातो. बिर्बलाची गोष्ट लोक सांगतात कीं, पादशहानें मुसलमानाचा ब्राह्मण बनवावयास बिर्बलास सांगितलें व त्यानेंही बरें ह्मणून सांगून एके दिवशीं बादशहाची स्वारी एके रस्त्यानें जाणार अशी बातमी ठेवून एक गाढव धरून त्याची मालिश करित त्या रस्त्यावर बिर्बल उभा राहिला. बादशहानें हें पाहिल्यावर बिर्बलास पुसलें कीं, हें तूं काय करतोस? बिर्बलानें सांगितलें खुदावंत गधेका तेजी बनाताहूं. बादशहा ह्मणाला ये बात कैशी होगी. बिर्बलानें सांगितलें कीं, गधेका घोडा नै बनेगा तो मुसलमानका ब्रह्मनबी नै होयेगा. तसें या साहेब लोकांस कितीही उत्तेजन दिलें तरी त्यांस देशांतील रीति भातीची माहिती होणार नाहींसे दिसतें. राजर्स, केनडी आणी अंडरसन यांनीं हिंदुस्थानांतून पांच पांच लाख रुपये तरी आजपर्यंत नेले असतील व हिंदुस्थानांत काळयाचे पांढरे केस झाले तरी लोकांस वीस शेर मिठापेक्षां अधिक मीठ घरीं न ठेऊं देण्यापासून कांहीं गैरसोय व्हवयाची नाहीं असें ह्मणण्यावरून त्यांस लोकांची माहिती कितपत आहे हे उघड दिसतें. यांस कदाचित ही गोष्ट माहित नसली तरी नेटिव मेंबर सांगण्यास होते पण त्यांचें ह्मणणें न ऐकतां असें करण्यापासून लोकांस कांहीं गैरसोय होणार नाहीं असें ह्मणाले. काय ही छाती! व किती हा उद्धटपणा!

या व दुसरे बिलाचे संबंधानें लोकांस इतकेंच सांगणें आहे कीं, जरी हीं बिलें मुंबईचे कायदे करणारे कौन्सलानें लोकांचे अर्जाकडे नजर न देतां पास केलीं तरी लोकांनीं धैर्य सोडूं नये. गवरनर जनरल साहेबास अर्ज करून आपला सर्व हवाल गुजर करावा आणि अर्ज न ऐकतां जर त्यांनीं मंजुरी दिली तर स्टेट सेक्रेटरीस अर्ज पाठवावा. उगीच बसून उपयोग नाहीं. जसा प्रसंग येईल तसें चाललें पाहिजे. लोकांनीं आपल्या दुःखाची दाद विलायतेपर्यंत नेऊन पोचवावी. व तेथें दाद न लागल्यास उपाय नाहीं. मग देवच आपल्या वाइटावर आहे असें समजावें.

---

हें पत्र अकोला एथें लंडेराव बाळाजी फडके यांनीं वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

Registered No. 4—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ | अकोला, रविवार ता० १९ अक्टोबर सन १८७३ इ० | अंक ४२

## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु० |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ९ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १।० |
| अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१।६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| " दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

### स्त्रीगीतसंग्रह भाग २ रा.

पहिल्या भागाप्रमाणेंच ह्यांत स्त्रियांच्या म्हणण्यांत येणारीं प्रसिद्ध व मनोरंजक अशीं देवादिकांच्या रसाळ कथेचीं वगैरे गाणीं असून चित्तरंजनार्थ शेवटीं उखाणे हीं आहेत. गाण्याचा भावार्थ, कठीण शब्दांवर टीपा इत्यादि दिल्या आहेत. फक्त जास्ती मिळून समयविशेषीं गाण्याच्या चाली वरतीं दर्शविल्या आहेत. किंमत आणे ६ सहा.

ज्यांस हें पुस्तक घेणें असेल त्याणीं खालीं सही करणाराकडेस डांकहशीलासुद्धां किंमत आणे ८ आठ पाठविली असतां पुस्तक रवाना करण्यांत येईल.

महादेव गोपाळ पटवर्धन,
क्लार्क निसबत जनरल ट्राफिक म्यानेजर. जी. ऐ. पी. रेलवे मुंबई बोरीबंदर.
मुंबई, गणेशवाडी.

### स्त्रीगीतसंग्रह. भाग १ ला

**किंमत आणे सात.**

सदर्हू पुस्तक ज्यांस घेणें असेल त्यांनीं वर लिहिलेले पत्यावर डांकहशीलासुद्धां किंमत आणे ९ पाठविल्यास पुस्तक रवाना करण्यांत येई.

## पत्रव्यवहार

या सदरीखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस——

वि. वि. मी माहुरचे देवीचें दर्शन घेऊन अकोटास जाण्याकरितां या कारंजाचे मार्गानें आलों तों मार्गांत माझा एक मित्र भेटला त्यानें मला येथें ठेऊन घेतलें, व माझे ही मनांत इच्छा प्राप्त झाली कीं, हें शहर पहावें या हेतूनें येथें राहिलों आणि दुसरे दिवशीं पहाटेस शहर पहाण्याकरितां निघून सर्व शहरच्या सडका व बाजार वोळ पाहिली तेणेंकरून मनास आनंद झाला. येथील सडकांप्रमाणें व स्वच्छते प्रमाणें सर्व वऱ्हाडांत कीं जेथें मोठमोठे अधिकारी आहेत तेथेंही अशी सुधारणा नाहीं. कारण मी सर्व वऱ्हाडातील गाव आणि शहरें पाहिलीं आहेत. व हें कारंजे ही पूर्वीं पाहिलें होतें. तर त्या वेळच्या स्थितीशीं आणि आतांच्या स्थितीशीं जमीन अस्मानीचा फरक म्हटला तरी चालेल यावरून येथील अधिकारी रा. रा. बापूजी रंगनाथ ए. अ. कमिशनर हे याकामीं फार श्रम घेतात हें उघड दिसून येईल. त्यांनीं या शहराची फार चांगली सुधारणा केली आहे. परंतु लिहिण्यास दुःख वाटतें कीं, जसे आमचे बापुसाहेबांनीं श्रम घेतले, तसे जर एथील टाऊनचे चीफ का० हे नेहमी शहरांत फिरून आपले कर्तव्यकर्म चांगल्या रीतीनें करतील तर ह्या हीपेक्षां आणखी स्वच्छता होईल. मग सर्व शहरची शोभा पाहून घरीं आल्यावर कांहीं वेळानीं येथील लायब्ररीचे शिपाई बोलवा आले आणि मी ज्यांच्या घरीं आहे त्यांस म्हणाले कीं आज चार वाजतां कचेरींत सभा आहे. याजकरितां सभेस आलें पाहिजे म्हणून सांगून गेल्यावर माझे ही मनांत आलें कीं आपणही सभा पाहण्यास जावें कचेरीचा शोध करीत गेलो आणि पाहिलें तो फक्त रा. रा. बापुसाहेब आणि दोन तीन मोठ मोठया पागोट्याचे गृहस्थ बसले होते. या खेरीज गावांतील शेट सावकार वगैरे कोणी नव्हते, याजवरून मजला भास झाला कीं सभा झाली असावी. परंतु तेथें एक आमचे लहान पागोटेवाले देशबांधव उभे होते त्यांस विचारिता त्यांनीं उत्तर केलें कीं, आज लोकच आले नाहींत. मग बसलेल्या गृहस्थानीं सहा वाजेपर्यंत वाट पाहून निरुपाय होऊन ते घरीं चालते झाले. तर एडिटरराव कां कसे आहेत आमचे कारंजेकर बांधव कीं त्यांस पाडून अमृत पाजिलें पाहिजे. अशा अधिकाऱ्यानीं आपणाकरितां झटावें आणि आपण घरीं चकल्या पिटींत बसावें. अशी आमचे कारंजेकर गृहस्थांची स्थिति पाहून मजला फार वाईट वाटलें. कारण अशी ह्या शहरचे लोकांची स्थिति असेल अशी कल्पना देखील कोणाच्यानें करवणार नाहीं. नंतर दुसरे दिवशीं बपुसाहेब याणीं दोन जागले आणि एक लायब्ररीचा शिपाई असे बोलावण्यास पाठविले. तर पत्रकर्तेराव या लोकांची स्थिति अशी आहे कीं यांस मारून कुटून मुसलमान करावें लागतें, ह्या म्हणीप्रमाणें यांची अवस्था आहे. याजविषयीं मजला फारच वाईट वाटतें. नंतर ४ वाजण्याचे सुमारास सर्व लोक जमल्यावर जे कांहीं सभेत ठराव झाले व सभासदांची स्थिति होती. तिजविषयीं पुढचे अंकांत आपणास लिहून कळवीन कारण मजला येथें एक महिना राहावयाचें आहे आतां पत्रविस्तारास्तव पुरें करितों लोभ असावा हे विनंती मुक्काम कारंजे

आपला एक
फिरणारा.

रा. रा. पत्रकर्ते महाराज यांशी.

वि. वि. अश्विन शुद्ध १ स घटस्थापना होऊन शारदी नवरात्रास आरंभ होतो बहुतेकांचे घरीं दररोज सप्तशतीचा पाठ व शेवटीं होम हवन आणि श्रीदेवी प्रीत्यर्थ बळी [पशू]दान इत्यादि कुलधर्म बहुएक गावीं हेला मारितात हें प्रसिद्ध आहेच. ती सप्तशती म्हणजे देवीमहात्म्य हें मार्कंडेय पुराणांतील असून याचा अर्थ रहस्यासुद्धां हल्लीं माझे श्रवणांत आला त्यांत ब्रह्मादि देवत्रय व त्यांच्या पत्न्या यांची जी उत्पत्ति सांगितली ती अशी कीं

आदिमाया जी महालक्ष्मी तिणें प्रथमतां महाकाली आणि महासरस्वती अशा उत्पन्न करून लक्ष्मी व ब्रह्मदेव यांसही उत्पन्न केलें.

नंतर महाकालीनें शंकर आणि सरस्वतीनें विष्णू आणि पारवती यांजला उत्पन्न केलें (वंशवृक्ष पहा) **

पुढें ब्रह्मदेवास सरस्वती. विष्णूस लक्ष्मी आणि शिवास पारवती अशा दिल्या गेल्या

यावरून ब्रह्मदेवानें आपले भाचीशी विष्णूनें आपले मावशीशी आणि शिवानें आपले मावसबहिणीशी विवाह केला असें होत आहे.

मुळीं ब्रह्मदेवाचे विष्णु आणि शिव हे भाचे असून तो यांचा मामा असता विवाह संबंधानें हे उभयता त्याचे साले आणि तो यांचा मेहुणा झाला त्याचप्रमाणें शिव आणि विष्णु हे मूळचे मावसभाऊ असतां तेही पुढें साले मेहुणे झाले.

सरस्वती आणि पार्वती ह्या मूळच्या मावसबहिणी असतां ननंद भावजया झाल्या व लक्ष्मी यांची मावसी असतां पुढें ती यांची भावजय व ह्या तिच्या ननंदा झाल्या.

याप्रमाणें हा मोठा चमत्कारिक नात्याचा आपसांत घोटाळा होऊन नंतर ब्रह्मासरस्वतीपासून हें ब्रह्मांड (जगत्त्रय) उत्पन्न झालें व त्यांचे विष्णू पालन करित आहे.

हा पुराणाश्रित प्रकार सर्वांस कळावा या हेतूनें येते अंकांत छापण्याची कृपा कराल अशी आशा करितों कृपा असावी हे विनंती. तारीख ६, अक्टोबर सन १८७३ इसवी.

आपला मित्र.
लासगावकर.

* वंश वृक्ष टाइपांत करतां आला नाहीं·

## माझें नांव काय?

सुज्ञनहो, मी कोण व माझें नांव काय? हें आपल्यास माहित आहे काय? माझी आपल्यास विस्मृति तर पडली नाहींना? तर सांगा पाहूं माझें नांव काय तें? ओळख पटत नाहीं होय? असो काय सांगावें? या पूर्वीं म्हणजे ५०।६० वर्षांमागें मला सर्व लोक ओळखत असत, मी जरा येकीकडे झालें म्हणजे तुम्ही मला पहाण्यासाठी कावरे बावरे होत असा; आणि आतां माझें कसें स्मरण होत नाहीं? ठीक आहे" मादीवरून उतरला कवडीचा माल" या प्रमाणें सध्यां माझी अवस्था झाली, काय करूं? उपाय नाहीं. पूर्वीं माझ्या वाचून तुमचें कांहींच काम होत नसे, तें, आतां माझा वाचून सर्वच होऊं लागलें तर मग माझें नाहीं बरें विस्मरण होणार? असतु नशीब माझें.

कायहो? माझ्या लहान बहिणी वर का इतकी तुमची मेहर नजर? मी आणि ती तुमचीं कामें सारखींच करितो त्यांत मी तिजहून मोठी आहे या मुळें माझ्या हातून जितकीं तुमचीं कल्याणकारक कामें होतात तितकीं माझ्या बहिणीच्या हातून होत नाहींत, असें असतां तिलाच सर्व लोक मजपेक्षां विशेष चहातात, तर हें नवल नाहीं काय? देश हितेच्छु लोकांस माझी हीच विनंती आहे कीं त्यांनीं देशाचें हित करण्याच्या ज्या गोष्टी मनावर घेतल्या आहेत त्या पैकींच मी जी एकीकडे पडलें आहे त्या मजला उर्जितावस्थेत आणल्यास देशावर व मजवर उपकार होतील. कित्येक लोक माझा बराच आदर सत्कार करितात याबद्दल मी त्यांची फार आभारी आहे.

पत्रकर्ते महाराज, तुम्ही माझी कांहीं काळजी वाहून माझ्या कनिष्ठ भगिनी प्रमाणें लोकांची मजवर प्रीति बसेल असें करा तुम्हीही माझे हितकर्ते आहात सबब तुम्हापाशीं आलें आहे तुमच्या पुणेकर को० क० नीं जसें माझ्या हितकर्त्यांस दूषण दिलें तसें तुम्ही न करितां हें माझें म्हणणें सर्व देशबांधवांच्या कानावर घालाल ही आस आहे. येतें आतां लोभ असूद्या. हा विनंती.

तुमची
मी

(नाशिक ता० ९ आक्टोबर)

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि. वि. इकडे पाऊस अगदी नाहींसा होऊन चांगलें कडक पडूं लागलें आहे. एक दोन पावसांची अद्याप जरूर आहे. हवा चांगली आहे रोगराई म्हणण्यासारखी नाहीं.

आह्मास लिहिण्यास आनंद वाटतो कीं, गेल्या रविवारीं येथील लायब्ररीगृहांत लायब्ररीसंबंधानें एक सभा भरली होती. येथील विद्यालयांतील कांहीं मंडळीनें एक आठवड्याची सभा केली आहे तिची हकीकत पुढें देईन. याच मंडळीचे मनांत लायब्ररींतील सर्व अव्यवस्था काढून टाकण्याचें आलें आणि ते त्या संबंधी कांहीं तजवीज करणार तोंच ए० अ० कमिशनर मि० अबदुल हक्क साहेब यांचे येथें आगमन झालें. व यांचेही मनांत तेंच आलें. हे साहेब पूर्वीं येथें होते ते वेळेस ही त्यांनीं आपलेकडून होईल तितकी मदत दिली होती व आतांही ते आल्याबरोबर त्यांनीं तेंच काम हातीं धरलें हें, पाहून आनंद होतो. लायब्ररीचे वर्गणीदाराकडे वर्गणीसंबंधानें फार बाकया राहिल्या होत्या त्यापैकीं बहुतेक आमचे ए० अ० कमिशनर यांणीं वसूल केल्या. व त्यांणीं त्या

वसूल केल्या नसत्या तर खचीत तो पैसा लायब्ररीस मिळणार नव्हता. लायब्ररीचे संबंधाने म्यानेजिंग कमिटीवगैरे सर्व व्यवस्था झाल्या परंतु ज्यास्ती वर्गणीदार जसे मिळावेत तसे मिळाले नाहींत. ह्या लायब्ररीस मदत लोकांची ह्मणा अगर सरकारची ह्मणा फार थोडी असल्याकारणानें बुकांचा व वर्तमानपत्रांचा भरणा कमी आहे. ह्या लायब्ररीस सरकारांतून कांहीं ज्यास्त मदत मिळेल तर फार चांगलें. हल्लीं लायब्ररीचे कामांत नवीन आलेले ए० अ० कमिशनर व डे० ए० इन्स्पेक्टर यांणीं चांगली मदत दिली व त्यांचे हें कृत्य फार वर्णनीय होय. यांणीं घातलेला मार्ग सदोदित पुढें चालो असें आह्मी इच्छितों. आमचे नवीन आलेले ए. अ. कमिशनर मुसलमान असून यांस मराठी चांगलें बोलता येतें. आतां यांत कांहीं अशुद्ध येतें त्यास त्यांचा नाइलाज आहे. इंग्रजीही बरेंच जलदीनें बोलतात परंतु त्यांच बोलण्यावरून इतकें सहज दिसून येतें कीं नेहेमी सवय असल्यावरूनच इतकें जलदी बोलता येतें. वास्तवीक ते इंग्रजी शिकावे तसे शिकले नाहींत तरी एकाएकी हा उणेपणा त्यांत दिसून येत नाहीं. दुसरी गोष्ट अशी आहे कीं, लायब्ररीची सभा झाली तींत त्यांचे बोलण्यांत एकादे बाबदींत फार निस्पृहता दिसूं लागली व दुराग्रहासारखे आपलेच मत स्थापित करण्याविषयीं त्यांचा कल फार दिसला याकडे आमचे मेहेरबानसाहेब लक्ष देतील व कांहीं सुधारणा करतील अशी आशा आहे. व याच वेळीं त्यांस आणखी असें सुचविणें आहे कीं, "घाईनें जें काम केलें तें कच्चें रहातें" ही ह्मण त्यांणीं पूर्णपणें लक्षांत ठेवावी. असो, यांचे येण्यामुळें लायब्ररीचा पुन्हां ऊर्जित काळच आला असें आम्हीं समजतों व हे जर येथें कायम झाले तर आणखी अशीं कित्येक लोकोपयोगी कामें होतील अशी भरपूर उमेद आहे.

येथील इं. मराठी शाळेंतील घड्याळ आज बरेच दिवस झाले चोरीस गेलें. कोठें गेलें व कोणीं नेलें याचा अद्याप पत्ता लागला नाहीं. पोलिसाकडे लागलीच या बाबतींत वर्दी दिली असून अद्याप पत्ता लागत नाहीं हें पाहून फार आश्चर्य वाटतें. चावडीवर दरवडा या ह्मणीप्रमाणे ही गोष्ट झाली. तें घड्याळ नच सापडलें तर त्या शाळेस दुसरें असणें जरूर आहे असें आम्हीं आमचे एजुकेशनल इन्स्पेक्टर यांस कळवितों.

पुसद तालुक्यांत एक पोलिस शिपायानें एका महाराचा खून केला तो असा कीं, त्या शिपायानें महार याजला वाटाड्या ह्मणून बरोबर घेतला होता. त्या महाराचे कानांत एक सोन्याची भिगबाळी व कंबरेंत कांहीं रुपये आहेत असें समजल्यावरून त्याणें त्या महारास पुष्कळ दारू पाजली व दारूचे अमलांत तो महार अगदी गुंग झाला आहे असें पाहून ती भिकबाळी व रुपये घेण्याकरितां त्याणें महाराचा वाटेतच खून केला, थोडक्या किमतीचे मालाकरितां एखाद्याचा खून करणें ह्मणजे केवढी दुःखाची गोष्ट!!! अशा गोष्टी इंग्रजी राज्यांत अद्याप नेहेमी घडतात हें पाहून फार आश्चर्य वाटतें. हल्लीं तो कैदी चौकशीकरितां येथें आणिला आहे. काय निकाल होतो तें पहावें.

मजुरें येथील हेड मास्तर याणें तेथील नाइकमलची बटीक काढून नेली असें समजल्यावरून त्या नाइकानें मास्तराबद्दल डे. ए. इन्स्पेक्टर यांजकडे रिपोर्ट केला. तें प्रकर्ण डे. इन्स्पेक्टर यांणीं डे. कमिशनर साहेब यांजकडे पाठविलें व त्यावरून त्या मास्तरास सस्पेंड करण्याचा हुकूम झाला. हल्लीं तो मास्तर वाशिमासच आहे व त्याची चौकशी चालू आहे. विद्यालयांतील लोकांची; अशी वर्तणूक असणें हें त्या खात्यास केवळ लांछन आहे विद्यालयांतील लोक सन्मार्गानें चालतात याविषयीं जी लोकांची समजूत; आहे ती अशा आणखी कांहीं गोष्टी घडून आल्या तर उलट होणार आहे. कळावें लोभ असावा ही विनंती.

आपला मित्र
लोकहितेच्छु.

## नोटिसा.

नोटिस—बाळाजी शिवराम नाईक सावणे राहणार खामगाव यांस खालीं सही करणार यांजकडोन नोटिस देण्यांत येते की वडिलोपार्जित मालमिळकतीचा निमें विभाग आमचा आह्मास न देतां सर्व इष्टेटीचा मालक मीच आहे असें बोलून हिशासंबंधीं तंटा करिता यास्तव या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, आजतारखेपासून १५ दिवसांत सर्व मिळकतीचा निमे हिस्सा आमचा आह्मास करोन द्यावा असें न केल्यास सरकारी रीतिप्रमाणें फिर्याद होऊन खर्चा सहीत तुमचेकडून भरोन घेण्यांत येईल तारीख १८ माहे अक्टोबर सन १८७३ इ०

[सही] मंगळाजी शिवराम सावणे
दस्तुर खुद.

नोटिस—रा. राजश्री केशव नारायण कोल्हटकर मुकाम वाई जिल्हा सातारा यांस खालीं सही करणारांकडून नोटिस देण्यांत येते कीं, वऱ्हाडसमाचार छापखाना तिघांचे भागीदारींत असलेला सन १८७० चे डिसेंबर अखेर बंद केला. त्या संबंधी कारकर्तांचे मसूदे झालेले कांहीं तकारीवरून स्टांपकागदावर लिहून सह्या करण्याचे काम आजवर राहिलें गेलें. आतां तीन वर्षांची मुदत होत आली आहे तर ही नोटिस पोचताच आपण येऊन कागदपत्र पुरे करून जावें. डिसेंबर महिन्याचे १५ वे तारखेपर्यंत तुह्मी आलां नाहीं तर तुमचे सहीवाचून फारकतीचा कागद पुरा केला जाईल. व तसें करण्याचे संबंधानें काही नुकसान येईल तर त्याची जबाबदारी तुह्मावर राहील. कळावें तारीख १८ माहे आक्टोबर सन १८७३ इसवी.

खंडेराव बाळाजी फडके.
आबाजी खंडेराव दिवेकर.

वऱ्हाडसमाचार

मिती आश्विन वद्य १३ शके १७९५

## स्त्रीगीतसंग्रह.

या नावाचीं नवीं दोन पुस्तकें आलिकडे छापून प्रसिद्ध झालीं आहेत. व तीं मुंबईस विकत मिळतात याविषयीं जाहिरातही दोन आठवडे आमच्या पत्रांत प्रसिद्ध झाली आहे यावरून वाचकांस कळलें असेलच. या पुस्तकाची एकेक प्रत त्यांचे कर्ते रा. रा. महादेव गोपाळ पटवर्धन क्लार्क निजबत जनरल ट्राफिक म्यानेजर जी. आय पी. रेल्वे मुंबई यांनीं; आह्मास पाठविली ती आभार पूर्वक आह्मी स्वीकारितों.

स्त्रियांच्या सुधारणेसाठी अलिकडे बरीच कृत्यें घडत आहेत. ह्मणजे मुलींच्या शाळा झाल्या, त्यांजवर मास्तर नेमण्याकरितां बायकांचीं नार्मलस्कुलें झालीं, रांगोळ्या काढण्याचीं पुस्तकें झालीं, शिवणकामाचीं पुस्तकें झालीं, स्त्रियांकरितां स्वतंत्र मासिक पुस्तक झालें. पुण्यांत स्त्रिसभा झाली, तसेंच ५००० स्त्रियांचे जनरल हळदी कुंकू झालें. मुंबईस पुनर्विवाहोत्तेजक मंडळी झाली. दोन तीन पुनर्विवाह झाले. मिस मेरी कार्पेंटर बाईन विलायतेहून येऊन स्त्रिविद्याभ्यासाविषयीं लोकांस उत्तेजन दिलें, मुंबईस प्रार्थना समाजाचे ठिकाणीं पुरुषांबरोबर स्त्रियांही ईश्वराचे प्रार्थनें करितां प्रसिद्ध सभेंत जाण्याचा पाठ पडला. अशा कित्येक गोष्टींच्या प्रसंगांत सदरील महादेव गोपाळ यांचीं बायकांच्या गाण्यांच्या संग्रहाचीं पुस्तकेंही उपयुक्त आहेत. त्यांनीं हीं पुस्तकें तयार करण्यास फारशी विद्वत्ता लागली नसेल असें कोणी ह्मटलें तरी त्यास शोधक बुद्धीचा उपयोग फारसा करावा लागला नसेल असें कोणी ह्मणणार नाहीं. गाणीं जमवावयाचीं, तीं व्यवस्थित बसवावयाचीं, शुद्ध करावयाचीं, व त्यांचे टिपण लिहावयाचें ही खटपट बऱ्याच श्रमाची आहे यांत संशय नाहीं. व त्यांनीं प्रस्तावनेंत लिहिल्याप्रमाणें हीं गाणीं साध्य करण्यास स्त्रियांस अडचणी फार येतात ही गोष्ट खोटी नाहीं. आतां बायकांस गाणीं शिकण्यास व त्यांची आवृत्ती ठेवण्यास या पुस्तकांचा मोठा सुलभ मार्ग झाला या बद्दल आह्मी पटवर्धन यांची तारिफ करितों व त्यांच्या पुस्तकांचा पुष्कळ खप होवो असें इच्छितों.

## मुंबई हायकोर्टाचा एक महत्वाचा ठराव.

हल्लीं अमलांत असलेले क्रिमिनल प्रोसिजरकोड यांतील कलम ३४६ प्रमाणें आरोपी मनुष्याची जबानी व्हावयाची तिजवर त्याची सही पाहिजे किंवा नाहीं. व पाहिजे असल्यास कोणत्या प्रसंगीं पाहिजे याजविषयीं निरनिराळ्या न्यायाधिशांचीं निरनिराळीं मतें आहेत व सर्वत्र वहिवाट एकसारखी बहुधा नसेल असें आह्मास वाटतें. याजकरितां ह्या बाबतींत मुंबईच्या हाय कोर्टांत फुल कोर्ट बसून नुकताच एक निवाडा झाला तो तारिख १३ माहे आक्टोबर सन १८७३च्या टाइम्स आफ इंडिया पत्रांत पूर्ण छापला; आहे. परंतु स्थलसंकोचामुळें आह्मास त्याचें अक्षरशाह भाषांतर देतां येत नाहीं. तथापि तात्पर्य आम्हीं वाचकांस कळवितों.—

भडोच येथील सेशन कोर्टांत बाई रतन व दादाभाई या दोघांवर बाई रतन इचे नवऱ्याचा खून केल्याचा खटला चालून दादाभाई सुटला आणि बाई रतन इजला फाशीची शिक्षा सुनाविली. ह्या ठरावावर तिनें हाय कोर्टांत अपिल केलें त्या अपिलाची चौकशी जस्टिस; मेलविल व नानाभाई हरिदास यांणीं करून च्यार प्रश्न फुल कोर्टाचे ठरावा साठी पाठविले.

येथें प्रश्न घेण्यापूर्वी खटल्याची हकीकत थोडक्यांत सांगतो. बाई रतन इचा दादाभाई हा सासरा असून तिनें आपले नवऱ्याचे अन्नांत विषप्रयोग करून त्याजला तें खाऊं घातलें तेणेंकरून तो मेला. पोलिसानें तपास करित असतां एक सेकंड क्लास माजिस्त्रेट याचे समोर बाई रतन इजला नेऊन क्रिमिनल प्रोसिजरकोड कलम १२२ प्रमाणें तिची कबुलायत लिहून घेवविली ह्या जबानीखालीं बाई रतन इची सही घेतली नाहीं. ह्या जबानीशिवाय प्रत्यक्षतेचा पुरावा बाई रतन इजवर दुसरा नव्हता. याजकरितां फुल कोर्टाचे अभिप्रायास प्रश्न पाठविले ते.—

१. बाई रतन हिची सही कलम १२२ प्रमाणें घेतलेले जबानीवर नसल्यामुळें ती पुराव्यास ग्राह्य आहे कीं नाहीं?

२. जर अग्राह्य ठरेल तर ती जबानी बाई रतन इनें आपखुषीनें; दिली असल्या बद्दल दुसरा पुरावा घ्यावा कीं नाहीं?

३. ही जबानी खुनाचे गुन्ह्याविषयीं ची मान्यता अशी मानली पाहिजे कीं काय?

४. दादाभाई याजला सोडून दिलें यामुळें बाई रतन इजवर कायद्याप्रमाणें वर लिहिलेले पुराव्यावर खुनाचा किंवा दुसरा कोणताही गुन्हा लागू होईल कीं नाहीं?

फुल कोर्टाचा अभिप्राय:—पहिल्या प्रश्नाचा निर्णय करण्यासाठी कलम १२२ व कलम ३४६ यांचा अर्थ करणें व ३४६ कलमांतील शेवटचा भाग कलम १२२ प्रमाणें होणारे जबानीस कितपत लागू होईल याचा निश्चय करणें जरूर आहे.

ह्या दोन कलमांबद्दल पूर्वीच्या क्रि० प्रोसिजर कोडांत कलम १४९ व २०५ हीं कलमें होतीं त्या दोन्ही कलमांत आरोपीचे जबानीखालीं त्याची सही पाहिजे असें नव्हतें.

नवीन क्रिमिनल प्रोसिजरकोड ठरल्यापूर्वीं कलम २०५ चा अर्थ करण्याची ज्या ज्या प्रसंगीं जरूर लागली तेव्हां तेव्हां त्या कलमांतील नियमांप्रमाणें जबानी आरोपी याची झालीच पाहिजे असें ठर

विले गेले व कित्येक प्रसंगी दिलेली जबानी आरोपी याणें आपखुषीनें दिली कीं नाहीं याजबद्दल विशेष पुराव्यासाठी कज्जे परत चौकशीस पाठविले गेले आहेत.

कलम १२२ हे पोलीसचे तपासांतील असून ती जबानी कमिटींग माजिस्त्रेट यांच्यापुढें होणारे जबानीप्रमाणें नाहीं ही जबानी कलम ३४६ यांत सांगितले रीतीप्रमाणें घ्यावी असें आहे त्याअर्थी असल्या जबानीवर आरोपी याची सही पाहिजे.

जर सही झाली नाहीं तर कलम ३४६ यांतील शेवटले भागाप्रमाणें जबानी वाचून पुरावे घेण्याचा जो अधिकार सेशन कोर्टास दिला आहे तो फक्त कमिटींग माजिस्त्रेटापुढें होणारे जबानींत कांहीं उणेपणा राहिला असेल तर सेशन कोर्टांनीं चालवावा असें आह्मांस वाटतें. कलम १२२ प्रमाणें होणारी जबानी अपूर्ण राहिली असेल तर कमीटींग माजिस्त्रेटांनीं इतर पुरावा घ्यावा असें त्यावरून होत नाहीं. इतर पुरावे घेण्याविषयीं पूर्वींच्या कायद्यांत जे नियम सांगितले आहेत त्यांजवरूनही अशा प्रसंगीं तोंडचा पुरावा घेता येत नाहीं.

सरकारतर्फे असें बोलण्यांत आलें कीं कलम ३४६ यांत आरोपीची सही घ्यावी असा जो विशेष ठराव आहे. तो ज्यावेळेस न्यायाधीश स्वतः जबानी न घेईल तेव्हां लागू करावा. माजिस्त्रेटांनीं स्वतः जबानी घेतल्यास आरोपीचे सहीची जरूर नाहीं.

ही तक्रार आह्मांस मान्य नाहीं कारण कायदे करणारे मंडळीचा हेतु तसा नाहीं. जर तसा हेतु असता तर स्पष्ट ठराव होणें अशक्य नव्हते. हा विशेष ठराव मुद्दाम झाला आहे तो सर्व प्रसंगीं लागू आहे असें आह्मी ठरवितों.

याप्रमाणें अभिप्राय होऊन बाई रतन इची जबानी गैरकायदेशीर आहे व इतर पुरावाही घेण्यास आधार नाहीं असें फुल कोर्टानें उत्तर दिलें.

ह्या ठरावास अनुसरून जस्टीस मेलव्हिल व नानाभाई हरिदास यांणीं बाई रतन इजला सोडून दिलें.

## परीक्षेचे प्रश्न.

(फौजदारीशाला पिनलकोड)

१. खाली लिहिलेल्या शब्दाचा अर्थ सांगा.

गैर कायद्याचा फायदा, अन्यायाची प्राप्ति. गैर कायद्याचें नुकसान, अन्यायाचे नुकसान लबाडीनें, कपटानें.

२. एकांत कैद याजबद्दल इंडियन पिनलकोडमध्यें काय मजकूर आहे.

३. अपवादाचे बाबीमध्यें लहान मुलांनीं गुन्हा केला असतां काय नियम आहेत.

४. साह्य खोटा पुरावा बनवणें व अन्यायाची धमकी या शब्दांचा अर्थ काय?

५. दुसरे वर्गाचे माजिस्त्रेटाचे अधिकार काय आहेत ते लिहा.

६. ज्या जिल्ह्यामध्यें गुन्हा घडला त्या गुन्हेगाराची चौकशी त्याशिवाय दुसरे जिल्ह्यामध्यें केव्हां होऊ शकते.

७. पोलिसाच्या अधिकारांतील गुन्हा घडल्याची खबर पोलिस स्टेशनहौस आफिसर यास ज्या प्रथम कळली तेव्हांपासून तो कैदी धरला असतां माजिस्त्रेटासमक्ष कैदी नेईतोंपर्यंत पोलिसानें काय काय तजविजी कराव्यात?

जो पोलिस अधिकारी गुन्ह्याचा तपास करितो त्याणें कोण कोणत्या प्रकारचे व कशा रीतीनें रिपोर्ट करावे व वऱ्हाडांत ते रिपोर्ट कोणत्या तऱ्हेनें करावे?

८. खुनाच्या मुकदम्यांत पोलिस अधिकाऱ्यांनीं दुसऱ्या प्रतीच्या मा० चा हुकूम कैदीस २४ तासाहून ज्यास्ती मुदतीपर्यंत अटकेंत ठेवण्यास मागितला असला तर त्या माजिस्त्रेटांनीं काय तजविजी कराव्या.

९. पोलिस अधिकाऱ्यासमोर गुन्ह्याची केलेली कबुलायत पुराव्यास कधीं घेतां येते.

१० ज्या कैदीला हजर होण्याविषयीं माफी नाहीं असे कैदीचे अपरोक्ष घेतलेला पुरावा त्या कैदीच्या विरुद्ध केव्हां घेतला जातो.

११ आरोपित मनुष्यानीं केलेल्या गुन्ह्याचे कबुलायतीबद्दल पुराव्याचे कायद्याचे काय नियम आहेत.

१२ सन १८६१ चा आक्ट ५ यांतील कलम ३४ प्रमाणें कोणी मनुष्यांनीं अस्वच्छतेचा गुन्हा केला असतां वारंटावाचून पोलिस कैदींत केव्हां पकडूं शकतो.

१३ वऱ्हाडांत गावठी पोलिसाबद्दलचे नियमाप्रमाणें पोलिस पाटलाचें काम काय आहे व त्यांचे अधिकार काय आहेत?

मुलकी

१. ज्या वेळेस सरकारी जमाबंदी झाली त्या वेळेस जीं शेतें पडीत होतीं. व ज्या शेतास जिराइताचा दर लागला आहे असे शेतांतील मोलवान फळावर किंवा झाडावर मालकीचा हक्क सेटलमेंट रूलप्रमाणें कोणत्या प्रसंगीं मिळाला जातो.

२. सारा लागलेली जमीन वहितीस घेण्याविषयीं अगर ती सोडून देण्याविषयीं काय काय तजविजी कराव्या लागतात.

३. अफूचे पेरणाबद्दल व तिचे उत्पत्तीबद्दल व परइलाक्यांत पाठविण्याबद्दल काय नियम आहेत ते लिहावेत.

४. हल्लीं तगाइ कोण कोणत्या कामाकरितां देतात. व तगाई देण्याचे मंजूर करण्यास कोणास अधिकार आहे. व ज्या कामाकरितां तगाई दिली जाते त्याच कामाकरितां तिचा उपयोग होतो कीं नाहीं हें पाहण्याकरितां तगाई देण्यापूर्वी नंतर काय काय पाहिले पाहिजे.

५. वऱ्हाडांतील पिण्याचे पाण्याचा पुरवठा दुरुस्त करण्याकरितां, सरकारानीं काम मदत देण्याचें कबूल केलें आहे व कोणत्या शर्तीवर ही मदत हल्लीं दिली जाते.

६. गावचे कामगाराचे हक्क काय आहेत व त्यांचीं कामें काय आहेत व त्यांजला मुशारा कसा मिळतो याजबद्दल स्पष्ट व खुलासेवार लिहा. व जमीदार लोकांसही त्यांचा रुसुम कसा व काय दरानें मिळतो याजबद्दल माहिती द्यावी.

(बाकीचे प्रश्न पुढील अंकांत लिहूं)

## वऱ्हाड

उद्या कमिशनर साहेबापुढें एका खुनी मुकदम्याचें सेशन चालणार आहे. व गुरुवारीं कमिशनर साहेब सेशनच्या एका मुकदम्याकरितां मलकापुरास जाणार आहेत.

—०००—

रा रा हणमंतराव रामचंद्र डिपुटी क्लार्क आफ धि कोर्ट अकोल्याहून परत येऊन आपले कामावर रुजू झाले. व त्यांच्या संबंधानें झालेल्या बदली बऱ्याचमागें हटल्या.

—०००—

पाऊस गेला. थंडी चांगली पडूं लागली. हवा रमणीय झाली आहे.

—०००—

मुलकी व जुडिशिअल खात्याचे संबंधानें लोअर व हायर स्टांडर्डची वगैरे वार्षिक परिक्षा होत असते ती अकोल्यास या आठवड्यांत झाली. तींत उमेदवार होते ते—

१. मि० डनलप साहेब असिस्टंट कमिशनर.

२. खान बहादूर शाबुद्दिन साहेब नवाब.

३. मि० अबदुल हक्क साहेब ए. अ. कमिशनर.

४. याद अली तहशिलदार.

५. मि० मीर सादत अलीखा तहशिलदार.

६. मि० अबदुल रहिमानखा तहशिलदार.

७. मि० दोराबजी कावसजी तहशिलदार.

८. मि० केशव जयकृष्ण अफिशियेटिंग क्लार्क आफ धि कोर्ट.

९. महादेव गोपाळ स्पा० का० क्लार्क.

१०. मि० विनायक महादेव नायब तहशिलदार.

यापैकीं मि० डनलप साहेब यांची परिक्षा फक्त मराठी भाषेची होती. मि० दोराबजी यांची हायर स्टांडर्डची होती व बाकी लोकांच्या लोअर स्टांडर्डच्या होत्या. शुक्रवारीं परिक्षेचें काम पुरें झालें. या परिक्षेचा निकाल रेसिडेंट साहेबांकडून दीड दोन महिन्यांनीं कळेल.

—०००—

मुंबई इलाख्यांत हिंदु मामलेदार व मुनसफ लोकांना रावसाहेब आणि मुसलमान व पारशी यांना खानसाहेब ह्मणत जावें असा ठराव झालेला आहे व अलीकडे शाळाखात्याचे डिपुटि इजुकेशनल इन्स्पेक्टर लोकांसही मामलेदारांप्रमाणें रावसाहेब ह्मणावयाचा मान द्यावा अशा विषयीं मुंबई इलाख्याच्या विद्याखात्याच्या डायरेक्टर साहेबांनीं सरकारास शिफारस केल्यावरून त्यांनाही रावसाहेब असा आदरार्थी किताब देण्याचा तिकडे ठराव झाला आहे. आह्मी शिफारस करितों कीं आमचे हिकडील तहशिलदार व डिपुटि एजुकेशनल इन्स्पेक्टर यांसही रावसाहेब हे किताब देण्याविषयीं कमिशनर साहेबांनीं रेसिडेंट साहेबास शिफारस करावी. याचप्रमाणें दुसरेही तितक्या पद्वीचे व योग्यतेचे अधिकारीलोकांस तसा मान असणें अवश्य आहे असें आह्मांस वाटतें.

उमरावतीचे पत्र आल्यावरून कळतें कीं, कमिशनर साहेब चिखलदऱ्यास गेले. क्लार्क आफ धि कोर्ट इलिचपुराहून सेशन होऊन मागें आले. डिपुटि कमिशनर साहेब मोर्शीतापुर तालुक्याकडे गेले आहेत.

—०००—

वाशिमचे जंगल खात्याचे कानसरवेटर क्या० मारीसाहेब यांनीं सरकारी कामांत कांहीं अफरातफर केल्यामुळें त्यांस सस्पेंड करून इलिचपुरचे इन्स्पेक्टर त्यांचे जागेवर नेले आहेत असें वाटतें.

मि० अबदुलहक्क साहेब ए० असि० कमि० ८ दिवसांची रजा घेऊन पुणें, नगराकडे गेले आहेत.

—०००—

मि० नौलिस साहेब यांनीं प्रकृती अस्वस्थ झाली होती ह्मणून हवा बदलण्यास रजा घेतली. आता अकोल्यास फक्त मि. डनलाप साहेब असिस्टंट यांचें कोर्ट राहिलें. येणेंकरून लोकांच्या कामाची फार गैरसोय होईल. आह्मांस वाटतें कीं अडगावाहून रा. रा. श्रीकृष्ण नरहर यांस येथें आणून रा. म. गोविंद राजअण्णा तहशिलदार यांस अडगावास कांहीं दिवस नेमिती तर बरें होईल.

—०००—

इलिचपुराहून एकानें आह्मास लिहिलें आहे कीं, तेथील स्मालकाज कोर्ट अकोल्यास पाठविण्याविषयीं हिंदुस्थान सरकारचा ठराव झाला, परंतु उमरावतीहून । कमिशनर साहेबाकडून इलिचपुरास अजून कांहींच लिहून आलें नाहीं. व क्या० मेकंजी साहेब यांनीं त्याविषयीं कमिशनर साहेबांस लिहिलें आहे.

—०००—

मि० रिव्हेट कार्नाक साहेब यांस वऱ्हाड व नागपुरचे काटन कमिशनरची जागा सरकारानें पुन्हा दिली.

## वर्तमानसार

मि० हाग साहेब पोस्टचे डायरेक्टर जनरल यास बायकांच्या लटल्यावरून हिंदुस्थान सरकारानें सस्पेंड केलें होतें पण पुन्हां कामावर रुजू केलें.

भडोचच्या लोकांनीं घरपट्टी माफ करावी ह्मणून मुंबई सरकारास अर्ज केला आहे.

खांडव्यापासून इंदुराकडे नर्मदा नदीपर्यंतची आगगाडी डिसेंबर महिन्यांत चालू होईल.

मुंबईत सेंट्रलप्रेस नावाचा नवीन सरकारी छापखाना झाला आहे त्यांतील कंपाझिटर लोकांस अमुक एक काम नित्य मोजून करीत जावें असें सांगितलें व तें त्यांच्यानें होईना सबब सुमार १६० कंपाझिटर चाकऱ्या सोडून गेले.

हिंदुस्थानांतील इंग्लिश सरकारच्या फौजेमध्यें "अधिकाऱ्याचा हुकूम" न मानण्याची बेपर्वाई बरीच सुरू झाली आहे.

साऱ्या हिंदुस्थानांत या वर्षीं पिकाचा आढाव चांगला आहे.

कऱ्हाडाजवळ गेले आगष्ट महिन्यांत होडी बुडून जो अपघात झाला त्याबद्दल साताऱ्याचे कलेक्टर साहेब यांणीं चौकशी करून तीन होडीवाल्यांस चार महिन्यांची सक्त मजुरीची प्रत्येकास शिक्षा दिली.

ज्ञा प्र.

नाशिकयात्रा— या आठवड्यांत सिंहस्थाचा बरीच गर्दी उडाली. मनुष्यांची मेळ एक लाखावर होऊन जिकडे तिकडे थवेच थवेच यात्रस्थ लोकांचे दिसतात. भिक्षुक लोकांची तर इतकी चैन झाली कीं, मंपप्रमाणें दक्षिणेच्या ठरावावर ब्राह्मण मिळू लागले. या गर्दींत कासार, तांबट, व हलवई या लोकांस बराच फायदा झाला आहे.

ईश्वराची अद्भुत करणी— मौजे पिंपळप्रगणे चादसेर तालुके एरंडोल जिल्हा खानदेश या गांवीं सुमारें सोळा दिवस झाले दोन प्रहरचे वेळीं नदी वरून पाणी पिऊन एका कुणब्याचे बैल परत येतें असतां एका पांढऱ्या बैलाचे आंगावर एक मोठा असला नाग फुसकाऱ्या टाकीत आला. व त्यास त्या शूर बैलानें पाहतांच नाभाड वासून एकदम त्याचे अंगावर जाऊन त्या नागोबास कडब्यांचे ताटाप्रमाणें भक्ष्य योजून मुखांत वास करावयास सांगितलें व तो $\frac{3}{4}$ तोंडांत गेल्यावर नंतर जवळ असलेल्या माणसानें पाहून भयचकीत होऊन लोकांच्या मदतीनें त्या बैलास धरून नागोबाची शेप तोंडाबाहेर लोंबत होती ती तोडून काढली. व जाभाडांत हात घालून दोन तीन तुकडे आणखी काढिले. निमा सर्प बैलाचे पोटांत जाऊन जे तुकडे काढले तेसुद्धा बैलास सहन न होऊन तो चवताळून माणसाचे अंगावर धांऊं लागला व ते काढलेले तुकडे खाऊन टाकिले असे झाल्यावर बैल लौकरच मरेल ह्मणून धन्यानें आशाही सोडिली होती. परंतु तो जिवंत असून शेतीचे वगैरे चांगलें काम करीत आहे.

ना. वृ.

नगर एथील हैस्कुल हेडमास्तरचे जागीं सोलापुरचे स्कुलावरील मि० गोपाळ बाबाजी होरपाठक यांची नेमणूक झाली.

मे० रेव्हिन्यु कमिशनर साहेब यांची स्वारी ता० १० रोजीं येथें येऊन दाखल झाली.

एथील फर्स्टक्लास सबार्डिनेट जज्ज रा. ब. पुरुषोत्तमराव सिद्धेश्वर यांस पुण्याहून साक्षीचें समन्स आल्यावरून त्यांची स्वारी गेले आठवड्यांत तिकडे गेली आहे. आतां कोर्ट बंद राहील त्या मुदतींत नेमलेले मुकदम्याचे पुनरपि वादी लोकांनीं भत्ते भरले पाहिजेत. याबद्दल सरकार कांहीं विचार करील काय?

सूत काढण्याचें यंत्र—करण्याचा प्रयत्न मुंबईंत रा. मोरोबा रामचंद्र कुंभारतुकड्यांत राहणारे यांणीं चालविला आहे. गेल्या खानवारीं पांच पंचवीस नवीन विद्वान मंडळी त्या यंत्राचा नमुना पाहण्यास जमली होती. हें अजून पूर्ण झालें नाहीं तरी कल्पना चांगली सुयुक्तिक आहे असें ठरलें. दोन मनुष्यें या यंत्रानें १०० सुतें काढितील असें दिसतें.

लऊन सलाम-मोरें कातडे पाहिजे कीं, त्यास लऊन सलाम करण्याचें थोतांड वऱ्हाड व नागपुर इलाख्यांतच आहे असें आह्मास वाटलें होतें. परंतु अशा प्रकारच्या सलामीची साथ आमच्या इलाख्यांतही आली आहे असें दिसतें. गुजराथ मित्रावरून कळतें कीं, खेड्याच्या कलेक्टरास त्याच्या हाताखालील नोकर सलाम करते वेळीं खालीं लऊन सलाम न केला तर त्यांची मर्जी जाते. एका नोकरास ही माहिती नसल्यामुळें त्यानें नेहमीच्या चालीप्रमाणें सलाम केला. तेव्हां कलेक्टरानें लागलेच सांगितलें तुला कसें वागावें ती रीत समजत नाहीं. याकरितां नोकरी सोड. परंतु चाकरी सोडणें चांगलें नाहीं असे नोकरानें मनांत आणून इतरांपेक्षांही चार बोटे खालीं लऊन आपला व आपल्या कुटुंबाच्या पोषणाकरितां सदर नोकर हल्लीं सलाम करूं लागला आहे.

मुंबई ग्याझेटवरून कळतें कीं श्रीमंत राजश्री मल्हारराव महाराज यांणीं रेसिडेंट साहेब सांगतील त्याप्रमाणें सुधारणा करण्याचें कबूल केलें असून सुरतेचे सबार्डिनेट जज्ज मि० मुकुंदराय मणिराय, यांस बडोद्यास स्थापन होणाऱ्या हायकोर्टाच्या जजाची जागा पतकराल कीं नाहीं असें विचारलें आहे.

रा. बाबाजी मनाजी लोहार यांणीं लोखंडी इंग्लिश मागाच्या नमुन्यावर लाकडी ही माग केला आहे तो पाहण्यास श्री. जर्गिलडीकर गेले होते व तो त्यांनीं चालू पाहण्याची इच्छा दाखविली आहे. या इच्छेपासून कृति घडेल तरच उपयोग.

अ. द.

## कायदेकौन्सिलचें काम व एतद्देशीय कौन्सिलदारां विषयीं लोकांचे उद्गार.

मुंबईच्या कौन्सिलनें कायद्यांचें काम मोठ्या झपाट्यानें, अगदी बेफामपणानें, लोकस्थितीचा व परिणामाचा विचार मनांत न आणितां व बेपर्वाईनें चालविलें आहे. त्यांत लोकांचें ह्मणणें, इंग्रजी व एतद्देशीय वर्तमानपत्रांच्या सूचना व कौन्सिलदारांचें मत हीं सर्व गुंडाळून ठेऊन सरकार व त्यांचे कामगार यांस जें वाटेल तेंच करण्याचा सर्व शौक दिसत आहे. हिंदू मुसलमान, पार्शी वगैरे लोकांच्या ह्मणण्याकडे दुर्लक्ष करून सिलेक्ट कमिटी पैकीं नेटिव लोकांचें ठरलेलें बहुमत मोडून व हिवाटीविरुद्ध वागून मयतांच्या व्यवस्थेविषयीं कायदा पास केला. कारखान्यांतील वाफेचीं यंत्रें तपासणीचा कायदाही तसाच युरोपियन व्यापारी इतकी तक्रार करीत असतां देखील पास केला. त्याप्रमाणेंच मुंबई इलाख्याचे सर्व लोक हाका मारीत असतां दस्तुऱ्यांचा कायदा पास केला. म्युनिसिपालिट्यांच्या कायद्याबद्दल जिकडे तिकडे हाकाहाक झाली तरी त्याचें दुसरें वाचन झालें; त्या प्रमाणेंच मिठाच्या कायद्याच्या मसुद्याबद्दल माटुंग्याचे कृष्णाजी वामन वगैरे ऐंशीं असामींचा एक अर्ज; पेण तालुक्यांतील मिठागरांच्या मालकांचा दुसरा, पेणेंतील मिठाच्या व्यापारी लोकांचा तिसरा; उरणचे अबदुल गफूर व दुसरे २९४ लोकांचा चवथा; मि. बयरामजी जीजीभाई व आणखी मीठ तयार करण्याचा वगैरे व्यापार करणाऱ्या ३६०० लोकांचा पांचवा; असे पांच अर्ज व भिवंडीच्या सार्वजनिक सभेचें पत्र असे कागदपत्र आले असतां व लोक कौन्सिलच्या दरवाजापाशीं रड गाव यास जमले होते असे सर्व प्रकार झाले; तथापि विशेष फायदा न होतां त्याचें दुसरें वाचन झालें आज आणखी काय झालें असेल कोण जाणें. अशा स्थितींमध्यें लोकांचीं मनें खळवळून जाणें हें साहजिकच आहे. ते सरासरी निराश होऊन आतां कांहीं करून उपयोग नाहीं. ईश्वरास जेव्हां आमची करुणा येईल तेव्हांच काय तें आमचें बरें व्हावयाचें असेल तें होईल असे लोक बोलूं लागले. कित्येक त्वेषानें व निराशेनें असेंही ह्मणूं लागले कीं, अशा स्थितींत कौन्सिलांतील एतद्देशीय सभासदांनीं विनाकारण आपला व आपल्या लोकांचा अपमान करून घेत राहावें हे चांगलें नाहीं. त्यांनीं अशा वेळेस स्पष्ट सांगून राजिनामे द्यावे यांत त्यांस भूषण आहे असे उद्गार आमच्या व टैम्स पत्रांत कांहीं पत्र पाठविणारांचे दृष्टीस पडले इतकेंच नव्हे; परंतु आह्मी अशी एक वदंता ऐकिली कीं, येथें व पुण्यास कांहीं लोक मिळून नेटिव सभासदांस राजिनामे देण्याविषयीं विनंतीपत्रें अगर सूचनापत्रें पाठविण्याचा विचार करीत आहेत आतां हें वर्तमान कितपत खरें आहे हें आह्मांस सांगवत नाहीं. परंतु अशा वदंतेवरून लोक फार त्रासले व निराश होऊन सरकारास यथेच्छ वाटेल तसे, बेडेनांकडे व हवेतसे कायदे करूं द्यावे, इंग्रज सरकारांत दाद व रयतेच्या हिताचा व सुखाचा विचार राहिला नाहीं असें स्पष्ट जिकडे तिकडे उद्गार काढूं लागले. हिंदुस्थानांत तर सर्व सदाव्रतपणाचा प्रचार चालला आहे आणि विलायतेंत तर दाद लागण्यास मार्ग नाहीं, ही अत्यंत दुःखाची गोष्ट आहे इतकेंच ह्मणून आह्मी हा मजकूर आज संपवितों.

इं. प.

इंग्रज लोक सावध व्हा. " नेटिव लोकांचा देशाभिमान पाहून इंग्रज लोक सावध व्हा " असें मागच्या सोमवारच्या अंकांत टाईम्स अव इंडियानें थट्टेनें लिहिलें आहे देशाभिमानाविषयीं नेटिव्ह लोकांची अशा प्रकारची थट्टा करण्याचें कारण, देशी कापड विकण्याकरितां व तें एका ठिकाणीं खात्रीचें विकत मिळण्याकरितां, जें नवें दुकान मुंबईत कित्येक देशाभिमानी गृहस्थांनीं खटपट करून घातलें आहे तें झालें. विलायतेंतील म्यांचेस्टर वगैरे ठिकाणच्या कापडांच्या कारखान्यां पुढे या देशांतील कापड विणाराचें काय चालणार आहे असें वाटून वर लिहिल्याप्रमाणें थट्टा केली आहे हें उघड आहे. विलायतच्या व्यापारामुळें हल्लीं आमच्या देशांतील इतर धंद्यांप्रमाणेंच, कापड विणण्याचा धंदाही मोडत जाऊन विलायतची पूर्वीं कधीं कोणी ऐकली नव्हती अशी बढती होत चालली आहे तेव्हां आपला धंदा सांभाळण्याच्या आमच्या अल्प प्रयत्नास त्यांनीं हसूं कां नये? परंतु कोणत्याही महत् कार्याचा आरंभ लहान असतो व कोणचीही मोठी गोष्ट एकदम सिद्धीस जात नाहीं. आमच्या अल्प प्रयत्नास इंग्रजलोक हसले ह्मणून, हातीं घेतलेली गोष्ट सिद्धीस जावयाची नाहीं अशी निराशा व्हावयाचें कारण नाहीं. कांहीं काळापूर्वीं हिंदुस्थानचें कापड विलायतेस फार जाऊं लागल्यामुळें त्या देशांतील कारखाने बसून हिंदुस्थानांत उत्पन्न झालेलें कापड घ्यावयाचें नाहीं असा निश्चय करण्याचा, जे इंग्रज आमच्या अल्प प्रयत्नास हल्लीं हसतात त्यांसच आला होता. त्यांच्या निश्चयास फळ कसें आलें तें आणि आपल्या डोळ्यांनीं हल्लीं पहात आहों कीं इंग्लंडांत कापूस उत्पन्न होत नाहीं. देश लहान असल्यामुळें लोकरही थोडीच उत्पन्न होत असेल. रेशीम मुळींच उत्पन्न होत नाहीं. इंग्रजलोक इतर लोकांच्या देशांतून व हिंदुस्थानांतून आमचा कापूस नेऊन आम्हांसच त्याचे कापडे करून पाठवितात ज्या देशांत कापूस व कपड्यांची इतर द्रव्यें उत्पन्न होत नाहींत. त्या देशच्या लोकांच्या निश्चयानें, ज्या देशांत कापसाची, व मेहेनत करणारांची समृद्धी आहे, अशा देशांतील कापडांचे कारखाने बंद पडले, तेव्हां या देशांतील लोकांनीं निश्चय केला असतां, त्यांच्या निश्चयास निदान आपल्या देशांतील कापडाचा व्यापार सांभाळण्या पुरतेंही फळ येणार नाहीं काय? टाइम्स आव इंडियास हसावेंसें वाटत असेल तर, त्यानीं पाहिजे तितक्यास यथेच्छ हसावें परंतु कापडाच्या व्यापाराच्या हल्लींच्या स्थितीचा विचार करूं गेलें असतां अगदी निराश होण्यासारखें चिन्ह दिसत नाहीं. पूर्वीं मुंबईंत एकही कापडाचा व सुताचा कारखाना नव्हता. हल्लीं दहावीस झाले असून दुसरे नवे कारखाने स्थापन करण्याविषयीं व्यापारी विचार करीत आहेत. याचप्रमाणें बाहेरगांवींही कारखाने स्थापन होऊं लागले आहेत. प्रथम आमच्या कारखान्यांतून फक्त जाडें मांजरपाट कापड मात्र उत्पन्न होत असे. परंतु आतां जगन्नाथी वगैरे तऱ्हे तऱ्हेचें कापड निघूं लागलें आहे व आणखी जसजसे कारखाने अधिक होऊं लागतील त्याप्रमाणें, आह्मांस हवें तें कापड निघूं लागणार नाहीं असें नाहीं. विलायतेंतील कारखान्यांनीं किती जरी स्वस्त कापड काढलें तथापि अखेरीस आमच्या देशांतील कारखान्यांबरोबर त्यांच्यानें टिकाव धरवणार नाहीं हें उघड आहे. कारण आह्मांस कापसाकरितां परदेशीं जावें लागत नाहीं किंवा तें विकण्याकरितांही परदेश पहावा लागत नाहीं. तेव्हां हल्लीं क्रम सुरू झाला आहे तो उत्तरोत्तर वाढून सुरळीत चालला असतां आह्मास काळांतरीं विलायती कापडाची भीति विशेष बाळगावयास नको. इतकेंच कीं, आमच्या लोकांचा निश्चय मात्र पाहिजे. मुंबईंत एक दुकान स्थापन होतांच, सोलापुर, नागपूर वगैरे ठिकाणें मिळून नेटिव कापडाचीं दुसरीं तीन दुकानें स्थापन झालीं ही अगदी अल्प गोष्ट आहे यांत संशय नाहीं. परंतु ती, विलायती कापडापासून आमच्या देशाचें मोठें नुकसान आल्याचें लोकांस वाटावयास लागलें आहे हें उत्तम प्रकारें सुचविते. लोकांस असें वाटावयास लागलें आहे ही लहान गोष्ट नव्हे.

ने. ओ.

हे पत्र अकोला एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.

Registered No. 4—1872.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक ७ | अकोला, रविवार ता० २६ अक्टोबर सन १८७३ इ० | अंक ४३

## जाहिरात.

### वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु. |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डाकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १॥८ |
| अखेर | २ |

### नोटिशीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

### विक्रीचीं पुस्तकें.

खालीं लिहिलेलीं पुस्तकें आमचे छापखान्यांत विक्रीस तयार आहेत. हीं पुस्तकें रोख किंमत देणारास मात्र मिळतील बाहेरगांवचे नेणारास डाकहाशील शिवाय पडेल.

| | रु. आ. पै. |
|---|---|
| पोथ्या वगैरे. | |
| अध्यात्म रामायण | ४—०—० |
| प्रायश्चित्तेंदुशेखर | ०—१२—० |
| रामनवमी व्रतोद्यापन कथा | ०—२—० |
| अनुस्मृती | ०—३—० |
| भीष्मस्तवराज | ०—२—० |
| पंचरत्नी गीता सोवळ्याचे बांधणीची | १—४—० |
| गायनप्रकाश | ०—४—० |
| सौभाग्यरत्न | ०—३—० |
| विवेकसिंधू | ०—८—० |
| चतुश्लोकी भागवत | ०—४—० |
| पंचायतन नामावली | ०—३—० |
| शिवसहस्र नामावली | ०—३—० |
| विष्णुसहस्र नामावली | ०—३—० |
| चक्रव्यूह | ०—१—० |
| भूपाळ्या | ०—१—० |
| व्यंकटेशस्तोत्र | ०—२—० |
| धांवे | ०—१—० |
| हरिपाठ | ०—१—० |
| अमृतरायाचे कटाव शुकरंभाचरित्र | ०—४—० |
| नळाख्यान. | ०—३—० |
| आर्या मोरोपंती द्रोणपर्व | २—०—० |
| ,, ,,मंत्र रामायण | १—८—० |
| वामन पंडितकृत श्लोक संग्रह भाग पहिला | ०—१२—० |
| सदरहू भाग दुसरा | ०—१२—० |
| गणपतीचे श्लोक. | ०—०—६ |
| भगवद्गीता | ०—६—० |
| रजोदर्शन शांति | ०—६—० |
| वाचन संबंधी | |
| बखर नीळकंठ राजाची. | ०—६—० |
| लोकहितवादीकृत निबंधसंग्रह | ४—०—० |
| रुक्मिणी हरण नाटक | १—८—० |
| विक्रमोर्वशी नाटक (संस्कृत) | ०—८—० |
| हरिश्चंद्र नाटक. | १—८—० |
| वालिवध नाटक | ०—६—० |
| इंग्रजांची बखर. | ०—६—० |
| वसंतमाला. | १—४—० |
| सर्पपरिज्ञान. | ३—०—० |
| वेताळपंचविशी मराठी | ०—८—० |
| ध्रुवाख्यान. | ०—१—० |
| गोपिचंद राजाचें नाटक हिंदुस्थानी. | ०—१२—० |
| बाळज्ञान. | ०—२—० |
| इंग्लिश पहिले बुकाचें भाषांतर | ०—२—० |
| सिंव्हासनबत्तिशी हिंदुस्थानी. | ०—८—० |
| मुद्राराक्षस | ०—१२—० |
| पहिलें पुस्तक मराठी. | ०—२—० |
| बाळव्याकरण | ०—०—९ |
| अंकलिपी | ०—०—६ |
| तोंडचे हिशेब | ०—२—० |
| कायद्यासंबंधी | |
| नादारीचे रूळ | ०—६—० |
| मुं. इ. मुलकी सर्क्युलर | ०—४—० |
| स्मालकाज कोर्टाचा कायदा सन १८६५ चा आक्ट ११ | ४—०—० |
| सन १८६५ चा आक्ट १ धारा बसविण्याचा। | ०—४—० |

## नोटिस.

नोटिस—रा. रा. सदाशिव व दामोदर नारायण कुळकर्णी मौजे किनगाव तालुके मेहेकर जिल्हा बुलढाणें यांस खाली सही करणार याजकडून देण्यांत येते की तुह्माकडे रा. रा. दिगंबर बल्लाळ पाटणकर यांचे रुपये ३९० येणें आहेत त्याबद्दल तेदेशीं जातिसमर्पी तुह्मी माझे नांवे पत्र रुपये देण्याबद्दल मिती अश्विन शुध्द १९ शके १७९३ नें दिलें त्यांत लिहिल्याप्रमाणें एक वर्ष होऊन गेलें असून रुपये अद्यापि पावते केले नाहींत. याकरितां ही नोटीस पावल्यापासून १५दिवसांत सदरील रुपये व्याजाचा हिशेब करून त्यासह आह्मास पावते करावे याप्रमाणें न केल्यास कायद्याप्रमाणें तजवीज करून नोटिसीचे खर्चासह फिर्यादीचा खर्चही घेऊ. तारीख २२ माहे अक्टोबर सन १८७३ इसवी.

(सही) उध्दव व्यंकटेश माटे दस्तुर खुद मुकाम बाभळी ता० दर्यापुर.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा० रा० वऱ्हाडसमाचार कर्ते यांस विनंती विशेष आपले येत्या अंकीं खालील दोन ओळीस जागा दिली पाहिजे कारण आपल्या पत्रद्वारें कांहीं अडचणी सरकारचे कानावर घातल्या असतां आपले ह्मणणे सरकारास रास्त वाटून अडचणी दूर होतील ही आशा आहे. मोर्शी तालुक्यांत जवळपास कोठे दिवाणी कोर्ट नाहीं. दाहापांच रुपयांची फिर्याद करण्यास देखील खर्च खात उमरावतीस जावें लागतें तेथें एकदां जाण्यानें निकाल होतो असे नाहीं, चौकशीस कांहीं तरी काळ तर पाहिजे. साक्षभत्ता वगैरे इतर खर्चात कोर्ट दूर या कारणानें ज्यास्त वाढून गरिब लोक नहाक बुडत आहेत याची दया आपणास आली तर ही गोष्ट आपण सरकारचे कानावर घालून दिवाणी कोर्ट वरूड अगर हिवरखेड अशा ठिकाणीं होण्याविषयीं सूचना कराल तर मोठे आभार होतील व इकडील दुःख निवारण्याचें फळ आपणास मिळेल.

साल मजकुरीं मोर्शी तालुक्यांत पिकें फार चांगलीं आहेत. पाऊस बेताचा झाला. शेतकरी लोक आनंदात आहेत रबी कशी सांपेल हें सांगवत नाहीं. हवा आतां दोन च्यार दिवसांत थंड पडूं लागली आहे.

वरूड एथील पाटलावर तीस च्याळीस अर्ज लाच खाण्याबद्दल झाले आहेत, चौकशी सुरू आहे.

मेहेरबान नागोराव नामे आसिस्टंट कमिशनर यांची स्वारी सदर चौकशी करितां आली होती. तारिख ४ रोजीं आमनेरास मुक्काम होता. तारिख ४ अक्टोबर रोजीं प्रातःकाळीं मेहेरबान नागोराव नाना यांणीं आमनेरच्या शाळेंत जाऊन परीक्षा घेतली. मुलांनीं सर्व विषयांत उत्तरें बरीं दिलीं. लिहिलेले नकाशे आणि मोडी बाळबोध अक्षरें पाहून ते फार खुष झाले. आणि मास्तर लक्षण बाळकृष्ण यांचे मेहेनतीबद्दल सांनीं तारिफ केली. या मास्तरानीं एथें एक बगीच्या शाळेत चालविला आहे तेणेंकरून त्या शाळेस फार शोभा आली आहे. गेल्या आठ दिवसांत हीच शाळा तहशिलदार याणींही पाहिली व कांहीं परिक्षाहि घेतली. असे वरिष्ठ अधिकारी याणीं आपलें लक्ष विद्यावृद्धीकडे दिलें तर वऱ्हाडांतील शाळा सुधारणार नाहींत असें नाहीं. हें उदाहरण इतर ठिकाणचे अमलदारास घेण्या सारखें आहे. नागोराव यांची स्वारी राजुरें हिवरखेड मार्गें उमरावतीकडे गेली. पत्रविस्तार फार झाला याची माफी असावी.

रयतेचा कनवाळू.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस

वाशिमाहून—ता० १२ अक्टोबर वि. वि. अलीकडे थंडी बरीच पडू लागली आहे आतां पावसाची आशा राहिली नाहीं. येथील दसऱ्याचे समारंभ विषयीं आपणास माहिती कळवितो. अश्विन शुध्द १ अथवा ५ स जसा मुहूर्त असेल तसें ध्वजारोपण करितात. यंदा ते द्वितीयेस झालें. ह्या ध्वजास जरीपटका आहे तो सर्व जडावाचा व गोसाचा असोन त्याची किंमत सुमारें ५०००० रुपये पावेतो असावी. द्वितीयेपासून देवळांत आज या भागांतील उद्या दुसऱ्या भागांतील १०० । २०० ब्राह्मण जेवतात. याप्रमाणें दोन तीन दिवस लोटल्यावर येके दिवशी येक चमत्कारीक गोष्ट घडली ती अशी की येक गरीब ब्राह्मण दररोज जेवण्यास येत असे तो ब्राह्मण जेवत असतांना आमचे देवळाचे अधिकारी हे त्यास त्याचे दररोज जेवण्यास येण्याविषयीं कांहीं बोलले. त्यावरून ब्राह्मणास राग येऊन तो तसाच जेवतांना उठून बाहेर गेला, मग कांहीं ब्राह्मणानीं त्याची विनवणी करून त्यास पुन्हा माघारा आणिला हो दोनशें ब्राह्मणात एक गरीब ब्राह्मण आमचे देवळाचे अधिकारी यांस ज्यास्त झाला होता कीं काय? असो. ही गोष्ट झाली त्याचे दुसरे दिवसापासून ब्राह्मण देवळांत जेवण्यास मुळींच गेले नाहींत. शेवटीं ब्राह्मण येत नाहींत असें पाहून ५—२५ मनुष्या पुरतेच रोज अन्न शिजवून कोणी कुणबी धुणबी लोकांस बोलावून आणून त्यास जेवण्यास घालण्याचा क्रम सुरू ठेविला. ह्याप्रमाणें जेवण्याची व्यवस्था झाली. आतां पूर्वी ९ दिवस पावेतो दर रोज एक एक वहन निघत असे ते षष्ठीपासूनच निघूं लागलें त्याचें कारण वहनाचे संबंधी ज्याचे मान अथवा हक्क ज्यांस मिळावयाचें ते त्यास आमचे देवळाचे अधिकारी देईनात ह्मणून ज्या दिवशीं ते मिळाले त्या दिवसापासून वहने निघण्यास आरंभ झाला. वहनें रात्रीचे १० वाजतां निघून परत सुमारें २—३ वाजतां येत. यंदा वहनाचे बरोबर मंडळीचा समाज मोठा नसून दिव्याची फारच कमताई होती. एकंदरीत पाहतां देवालयाचे हरएक बाबदींत आमचे देवालयाचे अधिकाऱ्याची फारच काटकसर दिसली. शुद्ध ७—८ पासून देवळात कळवंतिणींच्या नाच बैठका होऊ लागल्या. हा थाट पाहण्याकरितां गांवांतील शिष्ट मंडळीस दर वर्षीस आमंत्रणें जात असतात. पण यंदा तीं गेलीं नाहींत. दसऱ्याचे दिवशीं मात्र बोलावणीं गेलीं परंतु जी मंडळी गेली त्यांची मान मरातब न ठेवल्यामुळें ती सर्व परत आपले घराकडे चालती झाली. आमचे हल्लींचे देवळाचे अधिकारी यांस साहेब लोकांची हाजी हाजी करणें हें फार चांगलें माहित आहे. त्यातच मात्र त्यादिवशीं देवळाचे पैशांतून खर्च करून बांधलेले देवळाजवळ एकच दुकान आहे त्यांत नाच उभा करून आंत जाण्याची परवानगी होती. बाकीच्या बुध्या बोलावण्यावरून आलेल्या गृहस्थाकडे त्यांनीं कांहींच लक्ष पुरविलें नाहीं. ह्या दिवशीं रात्रीं देवापुढें दारू सोडली ती कांहीं थोडीशी बरी होती. व वहिवाटी पेक्षां ज्यास्ती होती देवळाचे अधिकारी याणीं केली ती गोष्ट काय ती येवढीच. दारूची वहिवाट ह्या २।३वर्षांतच बंद झाली होती. सुमारें ६० रुपयाची उडविली. ह्याच दिवशीं संध्याकाळीं देवाची पालखी निघून सिमाउल्लंघन करून पुन्हां परत नेऊ लागले ह्मणजे दारू सुटण्यास प्रारंभ होतो. पालखीचे वेळी मंडळीची गर्दी होती दसऱ्याचे दिवशीं किमानपक्ष ४००,५०० रुपयाची प्राप्ती दर वर्षास होते. शुध्द ११ चे दिवशीं सर्व रात्र गावांतील व आसपास

गावेच गाणार मंडळीची हजेरी झाली. द्वादशीत सर्व कळवंतिणींची हजीरी झाली. शुद्ध १३ चे दिवशीं सर्व गानारा बाजानीचा प्रसाद मिळाला ह्या दिवशीं ५००० पावेतों पात्र झालें असेल. जेवण आटोपल्यावर एक चमत्कारिक गोष्ट माझे पाहण्यांत आली ती अशी, एक मनुष्य जेवावयास मंडळी बसली होती त्यांचे मध्यभागीं जाऊन बसला मग ज्यानीं उष्टीं काढावींत त्यानीं त्या उष्ट्या पत्रावळी त्याचे अंगावर टाकाव्यात. ह्या पत्रावळी त्याचे अंगावर जोरानें फेंकल्यामुळें त्यास मार बसत असेल इतकेंच नाहीं तर त्याचा मात्र गुद्दमारा ही होत असेल. त्याप्रमाणें कित्येक स्त्रियांनीं आपलीं मुलें पुरुषांचे हातून त्या उष्ट्या पत्रावळींवरून लोळवून घेतलीं. या लोकांचें असें करण्याचें कारण माझे ऐकण्यांत असें आहे कीं मनुष्यांस कांहीं भूत पिशाच्याची बाधा झाली असल्यास त्यांनीं त्याजला उष्ट्या पत्रावळीचा मार दिला म्हणजे त्याची ती बाधा नाहीशी होते. पंक्तीविषयीं लिहिणें तें मागेंपुढें आणखी प्रसंग येतील त्या वेळेस लिहीन. पौर्णिमेचे दिवशीं संध्याकाळचे वेळीं फळीत व गोपाळकाला झाला. ह्या प्रसंगीं स्त्रीपुरुषांची इतकी गर्दी होते कीं मनुष्यास पाऊल ठेवण्यास जागा सापडत नाहीं. दहीहंडी फुटल्यावर सरासरी कामगार व गावचे शिष्ट मंडळींत बोलावणीं प्रसादाकरितां दरवर्षीं पडलेलीं असतात त्याप्रमाणें यंदा गेलीं नाहींत. व हजीर तो वजीर याप्रमाणें तेथें जितके हाते त्यासच बोलावून प्रसाद वाटला. कोणाचें न येणें झालें तर त्याचे घरीं प्रसाद पोहोचवीत असतात तेंही यंदा घडलें नाहीं. असो. प्रसाद वाटणें झाल्यानंतर रात्रीं सुमारें ११।१२ वाजतां पुन्हा एकवेळ जेवणें झालीं. ह्यावेळेस सुमारें १००० पात्र झालें असावें. प्रतिपदेस पुन्हांही एकवार गायक लोकांची हाजिरी होते. व येथें असा दसऱ्याचा सण संपला. एकंदरीत पहातां दसरा चांगला थाटाचा झाला नाहीं. सर्वांत मोठा सण येथें दसऱ्याचाच आहे.

मुलांस न मारतां जरबेनें जितका मुलांचा अभ्यास होईल तितका करावा. कांहीं कांहीं प्रसंगीं मुलांस मारणें जरूर पडतें. परंतु मारणें तें विचार करूनच मारलें पाहिजे. हें सर्व मास्तर लोकांस माहित आहेच परंतु त्याप्रमाणें त्यांचेकडून वर्तन होत नाहीं असें आढळल्यावरून मी एकवार विनंती पूर्वक मास्तर लोकांस कळवित आहे याजकडे ते पूर्ण लक्ष देतील अशी आशा आहे. कळावें बहुत काय लिहिणें लोभ असावा ही विनंती.

आपला मित्र

"लोकहितेच्छु"

---

**संगमनेर एथील व्यापारोत्तेजक मंडळी आणि एतद्देशीय व्यापाराची वृद्धी होण्याचें चांगलेसें उदाहरण.**

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि. वि. हे देशबांधवहो, व्यापाराची वृद्धि आणि स्वदेशीय मालाचा खप या विषयावर शहरोशहरीं कित्येक दिवसांपासून व्याख्यानें देण्याचा वगैरे क्रम चालू असतां त्यापासून व्हावा तसा व्यापारारंभ झाला नाहीं. हरएक नवीन प्रकार शोधून काढणें व तो शेवटास नेण्याची तजवीज करणें यांचीं साधनें जशीं शहरांतून मिळू शकतात तशीं खेडेगावांत मिळणें दुर्लभ आहे. हें सर्वांस माहितच आहे. तथापि वर्तमानपत्रांतील हाकाहाक वारंवार वाचून येथील चार व्यापारी आणि सभ्य मंडळी यांत अशी उमेद आली कीं "प्रयत्नीं परमेश्वर" ईश्वर कोणास यश देईल याचा नेम नाहीं यत्न करून पहावा. ह्या विषयावर बरीच भवति नभवति होऊन शेवटीं सुमुहूर्ताचा दिवस कार्तीक शुद्ध १ शके १७९५ नेमिल्याप्रमाणें एकबोटे यांचे वाड्यांत मंडळी जमली होती. झालेले विचार व निबंध मागाहून कळविण्यांत येतील. मुख्य मुद्याची गोष्ट ही कीं या गावीं रंगाचे व रेशमाचे कारखाने असून विणकर लोक शतशः असल्यानें नानातऱ्हेचे गावठी कपडे तयार होणें फार सुलभ आहे. उणीव कायती सूत तयार करण्याचे यंत्रांचीच, त्या विषयीं तजवीज केली पाहिजे. यंत्रांचे पुरवठ्याकरितां भांडवलाचे अंकास ५५०० पंचावनशें रुपये जमले काम चालेल तसें भांडवलास वर्गणीदार अगदीं अनुकूल आहेत असें दृष्टोत्पत्तीस आलें त्यावरून सूत काढण्याचीं गावठीं यंत्रें पाठविण्याविषयीं दोन तीन ठिकाणीं लागलींच पत्रें लिहिलीं.

मित्रहो, देवाजवळ मागितला एक पण देवानें दिले दोन, या म्हणीप्रमाणें प्रसंग आला आहे हा अर्थ घालवूं नका, स्वदेशीय मालांचीं दुकानें व्हावीं असें तुम्ही फार इच्छित होता परंतु येथें तर माल तयार करण्याचें व विक्रीचें अशीं दोन दुकानें होणार आहेत. येथें विणकर नाना प्रकारचे असल्याकारणानें पुष्कळ प्रकारचें कापड तयार होईल इतकेंच नाहीं परंतु नवीन नागपुर, पैठण या पेठांचें कापड लोक डोळें झाकून घेतात तसें या पेठेंतीलही घेतील आणि ही पेठ बाहेर गावींही माल पुरवील.

येथील मंडळी देशकल्याणेच्छु लोकांपाशीं इतकेंच मागते कीं ज्या यंत्रांनीं त्वरित सुरेख, टिकाऊ, व पुष्कळ सूत निघेल अशीं गावठी यंत्रें आणि तीं चालविणारीं वाकबगार मनुष्यें मिळवून द्यावीं; तसेंच जें जें कांहीं सुधारणेचें सुचवावयाचें असेल तें तें सुचवीत जावें. मंडळी, कारखाना तर भरभराटीस आणण्यास अगदीं सिद्ध आहे. पत्र पुरें करण्यापूर्वीं आज रोजीं घडलेल्या सत्कृत्याबद्दल आम्हा सर्वांस येथील मामलेदार रा. रा. गणेश आपाजी यांचे आभार मानणें भाग आहे. कारण ते आल्यापासून देशोदेशींचीं वर्तमानपत्रें आम्हास वाचण्यास मिळूं लागल्यानें आमचे मनांत व्यापाराचा ठसा उमटूं लागला आहे. या संबंधानें कोणास पत्रव्यवहार ठेवणें झाल्यास त्यांनीं येथील सबार्डिनेट जडज कोर्टांतील वकील रा. रा. गोविंद शंकर पिंपळखरे यांचे नांवें चालवावा. पत्रविस्तारांची माफी असावी हे विनंती.

तारीख २२ आक्टोबर सन १८७३.

समारंभ पाहणारा

"एम. डी."

# वऱ्हाडसमाचार

मिती कार्तीक शुद्ध ५ शके १७९५.

## परीक्षा.

परीक्षा म्हणजे शहाणपणाची किंवा योग्यतेची कसोटी होय. सर्व प्रकर्णांत परीक्षेची अवश्यकता आहे. मागें पेशवाईत कायद्याकानूवर कांहीं भर नव्हता तरी शास्त्राच्या व वेदाच्या परीक्षा होत असत. इंग्रजींत तर परीक्षेशिवाय बहुधा थोडींच कामें आहेत आणि वऱ्हाडांतही अलीकडे बऱ्याच परीक्षा होऊं लागल्या आहेत. उमेदवारांच्या, मुलांच्या, किंवा सरकारी कामें करीत असणाऱ्यांच्या परीक्षा व्हावयाच्या असल्या म्हणजे त्यांस मोठा धाक असतो व ते काळजीपूर्वक अभ्यास करित असतात व तेणेंकरून उद्योगास उत्तेजन येतें आणि आळस हटतो, इत्यादि प्रकारावरून पहातां अशा परीक्षा हमेशा होत असणें फार चांगलें आहे. परंतु सरकारी कामावर रुजू असलेल्यांच्या परीक्षा घेणें म्हटलें म्हणजे ते पास झाल्यावर त्यांस द्रव्याचा किंवा हुद्याचा अधिक फायदा दिला पाहिजे.

वऱ्हाडांत इतर ठिकाणाप्रमाणें शाळांच्या परीक्षा वर्षांत होतात त्याविषयीं कांहीं विशेष लिहिणें नलगे, परंतु त्याशिवाय कायदार लोकांच्या लोअर व हायर स्टांडर्डच्या परीक्षा होत असतात त्याविषयीं लोकांस कांहीं बोध होत नाहीं. तसेंच सालमजकुरीं कित्येक स्कुलमास्तर लोकांच्या परीक्षा झाल्या त्यांतही कांहीं व्यवस्था दिसून आली नाहीं, म्हणून या दोहों गोष्टीविषयीं दोन शब्द बोलण्यास आम्ही वाचकांची परवानगी मागतो.

लोअर स्टांडर्डच्या म्हणजे हलक्या प्रतीच्या परीक्षा देण्याकरितां वर्षास नायब तहशिलदार, तहशिलदार, क्लार्क आफ दि कोर्ट, व त्यांहूनही वरचे अधिकारी येतात. परीक्षेचें स्वरूप पाहिलें तर साधारण अगदी सुलभ असतें. तशांतही मामलेदारसारखीं कामें हाकणारे लोक वर्षेंच्या वर्षें घसरतात व सरकार त्याबद्दल त्यांस कांहीं पुसत नाहीं. तसेच विनपरीक्षेचे लोक न्यायकोटींचीं कामें चालवितात त्यांनीं परीक्षा दिलीच पाहिजे अशी सरकार सक्ती करीत नाहीं. व क्लार्क आफ धि कोर्ट वगैरे गृहस्थ परीक्षेंत वर्णनीय असे पास होतात त्याची विशेष चूक होत नाहीं. मग वर्षांचे वर्षांस हा तमाशा करण्यांत अर्थ काय आहे तें आम्हांस समजत नाहीं. सबब सरकार कळवील तर बरें होईल. असतु. या सालच्या परीक्षेचा परिणाम समजला म्हणजे आम्ही याविषयीं आणखी लिहूं. सालमजकुरीं मोठमोठाले खानसाहेब, हजरतसाहेब, मियासाहेब, नबाबसाहेब वगैरे परीक्षेस बसलेले आहेत व हे कित्येक वर्षें हुद्याचीं कामें चालवीत आहेत तेव्हां त्यांच्या विद्वत्ता व बुद्धिमत्ता कसोटीस लागण्याचा हा प्रसंग आहे तो कसा साजरा होतो पाहूं.

दुसरी परीक्षा या वर्षीं मास्तर लोकांची झाली, ती तर फार विलक्षण दिसते. इंग्लिश भाषा शिकविणाऱ्या ज्या मास्तर लोकांची म्याट्रिक्युलेशनची परीक्षा उतरली नसेल त्यांची परीक्षा घेतली जाईल म्हणून सर्क्युलर झालें होतें. पुढें दोन तीन प्रकारची निवड झाली असें ऐकतो. कोणाच्या परीक्षा घ्यावयास नकोत, कोणाच्या परीक्षा जागच्या जागीं परीक्षक येतील ते घेतील, व कोणाच्या परीक्षा अकोल्यास येऊन व्हावयाच्या, असे तीन प्रकार झाले. त्यांत अकोल्यास येऊन परीक्षा देणारांची यादीही बरीच होती असें ऐकत होतों पण गेल्या आठवड्यांत परीक्षा झाली पाहिली तींत सातच इसम बसले होते व त्यांतूनही कोणास कपाळदुखी उठून ते परीक्षेंतून उठून गेले व बाकीच्यांस इंग्रजी व मराठी सोपेंसें थोडें भाषांतर करावयास व एक पत्र लिहावयास सांगितलें. यांत परीक्षा म्हणण्यासारखें कांहीं झालें नाहीं. मग च मोठा समूह परीक्षेवाचून राहिला व परीक्षा दिलेल्यांत कांहीं पास व कांहीं नापास होतीलच व जागजागीं परीक्षा होणें आहेतच. व त्याशिवाय मेहेरबानीचा किंवा भक्त योग्यतेच्या मास्तरांचा वर्ग वेगळा राहिला न, असा सर्व प्रकार मनांत आणून पाहिला असतां ही छोटेखानी परीक्षा जी घेतली ती घेतली नसती तर कांहीं वावगें झालें नसतें, असें आम्हांस वाटतें, व कामावर हजर असलेल्या मनुष्याकडून हें असलें परीक्षेचें नाजूक दिव्य उतरवून घेऊंही नये असें आम्ही मागें एकदां लिहिलें होतें तें या प्रसंगीं लोकांस अधिक सयुक्तिक दिसेल असें आम्हांस वाटतें.

---

**सूचना.**

दिपवाळीचे सणाकरितां ४ दिवस कारखाना बंद राहिला व कित्येक नोकर बाहेरगांवीं गेले ते शुक्रवारीं आल्या नंतर पत्रास सुरवात झाल्यानें तें तयार होण्यास उशीर लागला यानबद्दल आश्रयदाते माफी देतील.

---

## वऱ्हाड

जळगांव येथें कांहीं ग्रामस्थ लोकांनीं एक नाटक तयार केलें आहे. व त्याचा एक खेळ झाला तो चांगला झाला असा हक आम्हांस दोन पत्रें आलीं आहेत. एका लिहिणारानें कळविलें आहे कीं या नाटकाच्या खेळापासून जी प्राप्ती होईल तिजवर ते एक स्वदेशीय कापडाचें दुकान काढणार आहेत. असें असल्यास हेतु बरा आहे.

—०००—

मेहेरबान कमिशनर साहेब पश्चिम वऱ्हाड हे सेशनाकरितां मलकापुरास गेले होते ते शनवारीं परत आले. आता येत्या आठवड्यांत वाशिमाकडे जाणार आहेत.

—०००—

देऊळगावची यात्रा या वर्षी फार कमी भरली होती व देवाचें उत्पन्न सुमार ३६००० रुपये झालें असें एकानें कळविलें आहे. या यात्रेविषयीं आमचे देऊळगावकर मित्र आम्हांस तपशील व सविस्तर हकीकत कळवितील तर बरें होईल.

—०००—

रा. बुलक साहेब डिपुटि कमिशनर प्रांतांत फिरावयास निघाले.

—०००—

उमरावतीचें डिपुटि कमिशनर यांस युरोपियन लोकांच्या जन्माचे रजिस्टर नेमिलें.

—०००—

निजामसरकारची रेलवे कलबुर्ग्यापासून वांदुरापर्यंत जानेवारीचे पहिले तारखेस सुरू होणार असें वर्तमान आहे.

—०००—

निजामसरकारचे दिवाण सर सालरजंग साहेब लाहोरास गवरनर जनरल साहेबांचे दरबार होणार त्याकरितां तिकडे जाणार म्हणून इंग्रजी पत्रांत वर्तमान आहे.

—०००—

अकोल्यांत हायस्कुलाची प्रवेशपरीक्षा उद्यां सुरू होईल. विद्यार्थी १०२ आले आहेत असें कळतें. उमरावतीच्या प्रवेशपरीक्षेकरितां ९४ विद्यार्थी आहेत.

—०००—

मि० कर्नाडी स्कूलविद्याखात्याचे आक्टिंग डायरेक्टर हे डाक्टर लिट्लर साहेब विलायतेहून आल्यावर रिकामे होणार, त्यास सातार्‍यास असिस्टंट कलेक्टरची जागा मिळणार असें वर्तमान आहे.

—०००—

मि० कारनाक साहेब वऱ्हाडचे काटन कमिशनर यांजवर पैशाच्या संबंधानें कांहीं गोष्टी आरोप येऊन ते सस्पेंड झाले होते परंतु हिंदुस्थान सरकारानें आंत त्याची चौकशी करून कारनाक साहेब यांस सक्त ताकीद दिली व पुन्हां कामावर त्यांस रुजू केलें. नेटिवांवर यैदि सरकार असें करित जाईल तर त्याची कीर्ती निष्कलंक राहील.

—०००—

उमरावतीच्या हायस्कुलाचे हेडमास्तर रा. रा. श्रीराम भिकाजी जटार बि. ए. हे रविवारचे सुटींत मित्रमंडळीस भेटावया करितां एथें आले आहेत.

—०००—

एलिचपुर—एथील म्युनिसिपालिटीचे म्यानेजिंग कमिटीमध्यें मेहेरबान लक्ष्मण बाळाराम तहशिलदार, रा० रा० वामन गणेश दे० ए० ई०, व मि० महमद नियास मेंबर, व रा० रा० भगवंतराव बापु देशपांडे आनररी माजिस्ट्रेट यांस चेअरमन नेमिल्याचें कळतें. प्र. सि.

—०००—

वऱ्हाडचा चालू सालच्या एप्रिल, मे, व जून या तीन महिन्यांचा जमाखर्चाचा हिशेब रेसिडेन्सीगाझेटमध्यें छापून प्रसिद्ध झाला आहे. त्यांतील ठोकळ रकमा येणेंप्रमाणें आहेत.

| जमा | रु. |
|---|---|
| ल्यांड रिविन्यु ( जमीनबाब ) | १७४२८४ |
| फारिष्ट ( जंगल ) | ६३८१० |
| अबकारीवरील जकात | १९४४८८ |
| मीठ | १२७६६८ |
| स्टांप | ६०३२२ |
| कायदा आणि न्याय | ९२२१८ |
| पोलिस | ९१३१ |
| विद्या. | २७७२ |
| व्याज | ६३९ |
| किरकोळ | १९०८७ |
| लष्करसंबंधी | १९२१ |
| पब्लिक वर्क्स | १८०७ |
| पब्लिकवर्क्स स्टेटरेल्वे | ० |
| | ७३४०४७ |

खर्च

| | |
|---|---|
| फंडाचीं पात घेणी | ११६६१ |
| जमीन बाब | १५९८९२ |
| जंगल | ३६१०६ |
| मीठ | २०१३० |
| स्टांप. | ३००१ |
| कारभार व सार्वजनिक खातीं | ९३८२९ |
| लहान खातीं. | १३६७२ |
| कायदा आणि न्याय. | ५०८०९ |
| पोलिस | ११११७८ |
| विद्या शास्त्र आणि कला. | १२६८२ |
| धर्मसंबंधी | ३३१ |
| वैद्यक संबंधी. | १९०१९ |
| स्टेशनरी व छापणें | ८६०१ |
| तहावरहुकूम नेमणुका. | ३६६६२ |
| किरकोळ. | ६२३२ |
| लष्करी पगार व नेमणुका. | ५१८९१२ |
| लष्करी इतर खर्च. | १४०६३६ |
| पब्लिक वर्क्स. | १८६७७६ |
| पब्लिकवर्क्स स्टेटरेल्वे. | २४९२ |
| | १४१९३२७ |

## वर्तमानसार

रशियाच्या बादशहानें खिवाचें संस्थान यांतील अमदरी नदीच्या उजवीकडील टापू आपले राज्यास जोडला. व बंदोबस्ताकरितां तेथें फौजा ठेवून लष्करी गवरनर नेमिला असें कळतें.

कलकत्ता शहरांत व आसपास १६०० ख्रिश्चन घरच्या घरीं विद्याभ्यास करितात असें समजतें.

मि० एदलजी रुस्तमजी यांस मुंबईच्या म्युनिसिपलकमिटीचे असिस्टंट हेल्थ आफिसर नेमिलें.

मुंबईतील प्रसिद्ध गृहस्थ मि० बाळाजी पांडुरंग, मि० लखमीदास खेमजी, मि० खटाव माणकजी, मुरारजी गोकूळदास, व गंगाराम किशोरदास हे सन्या हिंदुस्थानांत देशपर्यटणाचे इराद्यानें फिरावयास निघणार आहेत.

रजपूत संस्थानांतील सर्जन मेजर मूर यांणीं हिंदुस्थानच्या हवेच्या संबंधानें जीं दुखणीं येतात त्यांवर घरगुती औषधें व त्यांवरचीं त्याविषयीं अनुभवानें एक पुस्तक केलें आहे. व हिंदुस्थान सरकारास तें पसंत होऊन त्यांणीं मूर साहेबांस १००० रुपये बक्षीस दिले.

पंजाबांत मि० गोबीन नावाचे एक युरोपियन डिपुटी कमिशनर आहेत त्यांचें मन लाहोरच्याएका मुसलमान खानसाम्याचे मुलीवर आसक्त झाल्यामुळें तिशीं लग्न करण्याकरितां ते मुसलमान झाले. व त्यांणीं आपलें नांव शेख अबदुल रहमान असें ठेविलें. सरकारानें त्यांस असिस्टंट कमिशनर करून तेथून दिल्लीस पाठविलें व सस्पेंड केलें आहे.

आग्रा आणि भरतपूर यांचे दरम्यान रजपुताना स्टेट रेल्वे या आठवड्यांत सुरू होणार आहे.

रा. बा. लक्ष्मण जगन्नाथ बेळगावचे डिपुटी कलेक्टर यांस खानदेशांत व खानदेश पैकी मामलेदार रा. सा. काशिनाथ महादेव थत्ते यांस बेळगावास डिपुटी नेमण्याविषयीं मुंबई सरकारानें प्रसिद्ध केलें होतें. पण पुन्हां त्या नेमणुका रद्द केल्या. लक्ष्मणराव यांस बेळगावासच ठेऊन, खानदेशांत आनंदचे मामलेदार रा. सा. केशवलाल हिरालाल यांस अक्० हुजूर डिपुटी कलेक्टर नेमिलें.

म्यांचेस्टर शहरांतील एका मोठ्या व्यापारी पेढीनें मुंबईच्या आपल्या अडत्यास माहिती विचारिली आहे कीं मुंबईंत गिरण्या किती आहेत, त्यांतून सूत व कापड कसें निघतें, व म्यांचेस्टर पेक्षां कोणत्या गुणांत तें हलकें आहे, सूत व कापड कितीं तयार होतें व तें कोणकोणते ठिकाणीं विक्रीस जातें तें कळवावें. ही माहिती मिळाल्यावर तिकडील जकात कमी किंवा माफ करावी घेण्याचा इरादा आहे असें म्हणतात.

फ्रान्स देशांत पुन्हां राजसत्तात्मक राज्य होण्याची फार घाटाघाट चालली आहे. कौंट आफ शांबो यास राजा करावा, असें बहुत लोकांचे मनांत आहे. व नोबलेंही त्या गोष्टीकडे आहेत आहे. लुईस नेपोलियन वाच्या पूर्वीं हे कौंट फ्रान्स देशांत राज्य चालवीत होते व हे राजकुटुंबांतील आहेत. याचा राग रिपब्लिक मताकडे भर आहे

चीन देशांतील एक विजातीय उंच मनुष्य कलकत्त्याकडे आला आहे. त्याची उंची ८ फूट आहे.

नागपुरच्या श्रीमंत आनंदीबाई राणी साहेब यांच्या वर्षासनातून सांप्रत १६००० रुपये श्रीमंत जानोजीराव भोसले यांस देत जावे व बाकीची रकम इंग्रज सरकारचे सुमार सहापांच लक्ष रुपये कर्ज देणें आहे त्याच्या फडींत घ्यावी असा ठराव झाला.

दक्षिण महाराष्ट्र देशांत धारवाडाकडे गेल्या आठवड्यांत पाऊस पडला.

बंगाल्याकडील कांहीं सिव्हिल सरवंट ब्रह्मदेशांत पाठविणार आहेत.

चीन देशचे बादशहा सन १८६१ सालीं मरण पावले. त्यांचे चिरंजीव अल्पवयी असल्यामुळें २ राण्या राज्य चालवीत होत्या. आतां चिरंजीव मोठे होऊन ते राज्यपदाकड आले. चीन देश हिंदुस्थानापेक्षां मोठा असून त्यांत लोकवस्ती सुमारे ३० कोटि आहे.

होळकर सरकारच्या इंदुरांतील सदर कोर्टाचे चीफ जस्टिस रा. रा. धोंडो कामराव गरूड व जस्टिस रा. रा. विनायक जनार्दन कीर्तने यांचे तैनातीस सरकारांतून चोपदार मिळाले व उभयतांस सरकारांतून कांहीं बक्षीस दिलीं.

हिंदुस्थानांतील इंग्रजसरकारच्या ताब्यांतील मुलखांत सन १८७२ सालांत महामारीच्या उपद्रवाने एकंदर १६९,४९८ मनुष्यें मेलीं असें कळतें.

कलकत्ता व मद्रास म्युनिसिपालिट्या—कलकत्ता म्युनिसिपालिटीचा खर्च २५०९००० रु० आहे व तिला १,४०,००,००० रु० कर्ज आहे. मद्रास म्युनिसिपालिटीचें उत्पन्न ९,७१३४० रु० आणि तीस कर्ज १०,१९,२७० रु० आहे.

यांस प्रतिबंध —लहान मुलीं कसबीणीच्या धंद्याकरितां तयार करण्याच्या नीच उद्योगास प्रतिबंध चांगल्या प्रकारें व्हावा म्हणून बंगाल सरकारानें वरद्वानचे कमिशनर व मिदनापूरचे कामगार यांस हुकूम करणार आहे असें कळतें. या प्रमाणें सर्वत्र बंदोबस्त होईल तर चांगलें.

सर सालरजंग व सर टी. माधवराव यांस आपण फिनान्स कमिटीपुढें साक्ष द्यावयास जावें काय म्हणून विचारल्यावरून आपणावर राज्यकारभाराचा भार आहे तो सोडून जाणें होणार नाहीं असें त्यांनीं कळविल्याचें आमच्या ऐकण्यांत आलें म्हणून वाचितांटे कर्ते म्हणतात.

इं. प्र.

निकाडच्या चि. का. बगीरेत केली मारल्या बद्दल शिक्षा झाल्या त्याविषयीं वाचकांस माहीत आहेच, चि. कायांणीं बरेच दिवस झाले हाय कोर्टांत अपील केलें होतें. त्याचा निकाल ता. १६ मिनहू रोजीं होऊन सर्व अपीलांतून सोडून दिलें. व या खटल्यांत राव. रावसाहेब धोंडदेव मामलेदार यांणीं जी चवकशी केली होती ती फार बरोबर केली असेंही ठरल्याचें पक्के आधारावरून समजतें.

ना. वृ.

मि. ए टी क्राफर्ड सी. एस. यांस स्टेट सेक्रेटरींनीं आणली दोन महिन्यांची रजा दिली असें गेल्या सरकारी ग्याझिटांत छापलें आहे. यांच्या नांवावरून हे क्राफर्ड साहेब मुंबईचे माजी म्युनिसिपल कमिशनरच असावे असें वाटतें व तेच असतील तर ते अद्याप रजेवर आहेत, त्यांचे नांव अद्याप सनदांत आहे इत्यादि मजकूर पाहून मोठें नवल वाटतें. आम्हांस वाटतें तेच हे असतील तर त्यांस पुन्हां हिंदुस्थानांत चाकरीवर रुजू करण्यापूर्वीं, त्यांणीं मुंबई म्युनिसिपालिटींत जी उधळपट्टी केली तिची योग्य रीतीनें चवकशी करणें मुंबईसरकारास भाग आहे. तशी चवकशी न करिता सरकार जर त्यांस चाकरीवर रुजू करील तर, पेशवाईंत ब्राह्मणास जशी माफकी होती त्याचप्रमाणें हल्लींच्या राज्यांत इंग्रजांस आहे अशी जी लोकांची समजूत होत चालली आहे ती विशेष दृढतर होईल. भ. द.

काइनोर येथें संप्रत उत्तम रेशीम विकविण्याचा प्रयत्न चालला आहे. या कामांत तेथील मुख्य न्यायाधीश बाबू निलांबर मुकरजी हे फार खटपट करीत आहेत. काइनोरच्या महाराजानीं या बद्दल बहुत बक्षीस देऊन त्याचा पगार रु० १३०० होता तो २३०० केला तसेच महाराज वेळोवेळीं उत्तम रेशीम तयार करणारासही कांहीं बक्षीस देत असतात. आमचे दुसरे संस्थानिक व त्यांचे कारभारी आपल्या संस्थानांतील रयतेस कांहीं व्यापार शोधून काढून खास उत्तेजन देतील तर त्यांचीं संस्थानें भरभराटींत चढल्यावांचून राहणार नाहींत.

गावेच गाणार मंडळीची हजरी झाली. द्वादशीस सर्व कळवांतिणींनी हजीरी झाली. शुद्ध १३ चे दिवशीं सर्व गावास बालाजीचा प्रसाद मिळाला ह्या दिवशीं ५००० पावेतों पात्र झालें असेल. जेवण आटोपल्यावर एक चमत्कारिक गोष्ट माझे पाहण्यांत आली ती अशी, एक मनुष्य जेवावयास मंडळी बसली होती त्याचे मध्यभागीं जाऊन बसला मग त्यानीं उष्टीं काढावीत त्यानीं त्या उष्ट्या पत्रावळी त्याचे अंगावर टाकाव्यात. ह्या पत्रावळी त्याचे अंगावर जोराने फेंकल्यामुळें त्यास मार बसत असेल इतकेंच नाहीं तर त्याचा आत मुढमारा ही होत असेल. त्याप्रमाणें कित्येक स्त्रियांनीं आपलीं मुलें पुरुषांचे हातून त्या उष्ट्या पत्रावळीवरून लोळवून घेतलीं. या लोकांचे असें करण्याचें कारण माझे ऐकण्यांत असें आहे कीं मनुष्यांस कांहीं भूत पिशाच्याची बाधा झाली असल्यास त्यानीं त्याजला उष्ट्या पत्रावळीचा मार दिला म्हणजे त्याची ती बाधा नाहीशी होते. पंक्तीविषयीं लिहिणें तें मागेंपुढें आणखी प्रसंग येईल त्या वेळेस लिहीन. पौर्णिमेचे दिवशीं संध्याकाळचे वेळीं रुळीत व गोपाळकाला झाला. ह्या प्रसंगीं स्त्रीपुरुषांची इतकी गर्दी होते कीं मनुष्यांस पाऊल ठेवण्यास जागा सापडत नाहीं. दही हंडी फुटल्यावर सराफी कामगार व गावचे शिष्ट मंडळीत बोलावणीं प्रसादाकरितां दरवर्षांस पडतीत असतात त्याप्रमाणें यंदा गेलीं नाहींत. व हजीर तो वजीर याप्रमाणें तेथें जितके होते त्यासच बोलावून प्रसाद वाटला. कोणाचें न येणें झालें तर त्याचे घरीं प्रसाद पोहोचवीत असतात तेंही यंदा घडलें नाहीं. असो. प्रसाद वाटणें झाल्यानंतर रात्रीं सुमारें ११।१२ वाजतां पुन्हा एकवेळ जेवणें झालीं. ह्यावेळेस सुमारें १००० पात्र झालें असावें. प्रतिपदेस पुन्हांही एकवार गायक लोकांची हाजेरी होते. व येथें असा दसऱ्याचा सण संपला. एकंदरींत पहातां दसरा चांगला थाटाचा झाला नाहीं. सर्वांत मोठा सण येथें दसऱ्याचा आहे.

मुलांस न मारतां जरबेनें जितका मुलांचा अभ्यास होईल तितका करावा. कांहीं कांहीं प्रसंगीं मुलांस मारणें जरूर पडतें. परंतु मारणें तें विचार करूनच मारलें पाहिजे. हें सर्व मास्तर लोकांस माहित आहेच परंतु त्याप्रमाणें त्यांचेकडून वर्तन होत नाहीं असें आढळल्यावरून मी एकवार विनंती पूर्वक मास्तर लोकांस कळवित आहे याजकडे ते पूर्ण लक्ष देतील अशी आशा आहे. कळावें बहुत काय लिहिणें लोभ आहेच ही विनंती.

आपला मित्र

"लोकहितेच्छू"

---

**संगमनेर एथील व्यापारोत्तेजक मंडळी आणि एतद्देशीय व्यापाराची वृद्धी होण्याचें चांगलेसें उदाहरण.**

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि. वि. हे देशबांधवहो, व्यापाराची वृद्धि आणि स्वदेशीय मालाचा खप या विषयावर शहरोशहरीं कित्येक दिवसांपासून व्याख्यानें देण्याचा वगैरे क्रम चालू असतां त्यापासून व्हावा तसा व्यापारारंभ झाला नाहीं. हरएक नवीन प्रकार शोधून काढणें व तो शेवटास नेण्याची तजवीज करणें यांचीं साधनें जशीं शहरांतून मिळू शकतात तशीं खेडेगांवांत असणें दुर्लभ आहे. हें सर्वांस माहितच आहे. तथापि वर्तमानपत्रांतील हाकाहाक वारंवार वाचून येथील चार व्यापारी आणि सभ्य मंडळी यांस अशी उमेद आली कीं "प्रयत्नीं परमेश्वर" ईश्वर कोणास यश देईल याचा नेम नाहीं यत्न करून पहावा. ह्या विषयावर बरीच भवति नभवति होऊन शेवटीं सुमुहूर्ताचा दिवस कार्तीकशुद्ध १ शके १७९५ नेमिल्याप्रमाणें एकबोटे यांचे वाड्यांत मंडळी जमली होती. झालेले विचार व निबंध मागाहून कळविण्यांत येतील. मुख्य मुद्याची गोष्ट ही कीं या गांवीं रंगाचे व रेशमाचे कारखाने असून विणकर लोक शतशः असल्याने नानातऱ्हेचे गावठी कपडे तयार होणें फार सुलभ आहे. उणीव कायती सूत तयार करण्याचे यंत्रांचीच, त्या विषयीं तजवीज केली पाहिजे. यंत्रांचे पुरवठ्याकरितां भांडवलाचे अंकांत ५५०० पंचावन्नशें रुपये जमले काम चालेल तसें भांडवलास वर्गणीदार अगदीं अनुकूल आहेत असें दृष्टोत्पत्तीस आलें त्यावरून सूत काढण्याचीं गावठीं यंत्रें पाठविण्याविषयीं दोन तीन ठिकाणीं मागणीचीं पत्रें लिहिलीं.

मित्रहो, देवाजवळ मागितला एक पण देवानें दिले दोन, या म्हणीप्रमाणें प्रसंग आला आहे हा व्यर्थ घालवूं नका, स्वदेशीय मालांचीं दुकानें व्हावीं असें तुम्हांस फार इच्छित होता परंतु येथें तर माल तयार करण्याचें व विक्रीचें अशीं दोन दुकानें होणार आहेत. येथें विणकर नाना प्रकारचे असल्याकारणानें पुष्कळ प्रकारचें कापड तयार होईल इतकेंच नाहीं परंतु नवीन नागपुर, पैठण या पेठांचें कापड लोक डोळे झाकून घेतात तसें या पेठेंतीलही घेतील आणि ही पेठ बाहेर गावींही माल पुरवील.

येथील मंडळी देशकल्याणेच्छु लोकांपाशीं इतकेंच मागते कीं ज्या यंत्रांनीं त्वरित सुरेख, टिकाऊ, व पुष्कळ सूत निघेल अशीं गावठी यंत्रें आणि तीं चालविणारीं वाकबगार मनुष्ये मिळवून द्यावीं; तसेंच जें जें कांहीं सुधारणेचें सुचवावयाचें असेल तें तें सुचवीत जावें. मंडळी, कारखाना तर भरभराटीस आणण्यास अगदीं सिद्ध आहे. पत्र पुरें करण्यापूर्वीं आज रोजीं घडलेल्या सत्कृत्याबद्दल आम्हा सर्वांस येथील मामलेदार रा. रा. मंगेश आपाजी यांचे आभार मानणें भाग आहे. कारण ते आल्यापासून देशोदेशींचीं वर्तमानपत्रें आम्हास वाचण्यास मिळूं लागल्यानें आमचे मनांत व्यापाराचा ठसा उमटूं लागला आहे. या संबंधानें कोणास पत्रव्यवहार ठेवणें झाल्यास त्यांनीं येथील सबार्डिनेट जज्ज कोर्टांतील वकील रा. रा. गोविंद शंकर पिंपळखरे यांचे नांवें चालवावा. पत्रविस्तारांची माफी असावी हे विनंती.

तारीख २२ आक्टोबर सन १८७३.

समारंभ पाहणारा

"एम. डी."

---

# वऱ्हाडसमाचार

मिती कार्तीक शुद्ध ५ शके १७९५.

## परीक्षा.

परीक्षा म्हणजे शहाणपणाची किंवा योग्यतेची कसोटी होय. सर्व प्रकर्णांत परीक्षेची अवश्यकता आहे. मागें पेशवाईत कायद्याकानूवर कांहीं भर नव्हता तरी शास्त्राच्या व वेदाच्या परीक्षा होत असत. इंग्रजींत तर परिक्षेशिवाय बहुधा थोडींच कामें आहेत आणि वऱ्हाडांतही अलीकडे बऱ्याच परीक्षा होऊं लागल्या आहेत. उमेद्वारांच्या, मुलांच्या, किंवा सरकारी कामें करीत असणाराच्या परीक्षा व्हावयाच्या असल्या म्हणजे त्यांस मोठा धाक असतो व ते काळजीपूर्वक अभ्यास करित असतात व तेणेंकरून उद्योगास उत्तेजन येतें आणि आळस हटतो, इत्यादि प्रकारावरून पहातां अशा परीक्षा हमेशा होत असणें फार चांगलें आहे. परंतु सरकारी कामावर रुजू असलेल्यांच्या परीक्षा घेणें म्हटलें म्हणजे ते पास झाल्यावर त्यांस द्रव्याचा किंवा हुद्याचा अधिक फायदा दिला पाहिजे.

वऱ्हाडांत इतर ठिकाणाप्रमाणें शाळांच्या परीक्षा वर्षास होतात त्याविषयीं कांहीं विशेष लिहिणें नलगे, परंतु त्याशिवाय कायदार लोकांच्या लोअर व हायर स्ट्यांडर्डच्या परीक्षा होत असतात त्याविषयीं लोकांस कांहीं बोध होत नाहीं. तसेंच सालमजकुरीं कित्येक स्कुलमास्तर लोकांच्या परीक्षा झाल्या त्यानंही कांहीं व्यवस्था दिसून आली नाहीं, म्हणून या दोहों गोष्टींविषयीं दोन शब्द बोलण्यास आम्ही वाचकांची परवानगी मागतो.

लोअर स्ट्यांडर्डच्या म्हणजे हलक्या प्रतीच्या परीक्षा देण्याकरितां वर्षास नायब तहशिलदार, तहशिलदार, क्लार्क आफ दि कोर्ट, व त्यांहूनही वरचे अधिकारी येतात. परीक्षेचें स्वरूप पाहिलें तर साधारण अगदीं सुलभ असतें. तशांतही मामल्यासारखीं कामें हाकणारे लोक वर्षेंच्या वर्षें घसरतात व सरकार त्याबद्दल त्यांस कांहीं पुसत नाहीं. तसेच विनपरीक्षेचे लोक न्यायकोर्टाचीं कामें चालवितात त्यांनीं परीक्षा दिलीच पाहिजे अशी सरकार सक्ती करीत नाहीं. व क्लार्क आफ धि कोर्ट वगैरे गृहस्थ परीक्षेंत वर्णनीय असे पास होतात त्याची विशेष चूज होत नाहीं. मग वर्षांनिवर्षांस हा तमाशा करण्यांत अर्थ काय आहे तें आम्हांस समजत नाहीं. सबब सरकार कळवील तर बरें होईल. असो. या सालच्या परीक्षेचा परिणाम समजला म्हणजे आम्ही याविषयीं आणखी लिहूं. सालमजकुरीं मोठमोठाले खानसाहेब, हजरतसाहेब, मिरासाहेब, नवाबसाहेब वगैरे परीक्षेस बसलेले आहेत व हे कित्येक वर्षें हुद्याचीं कामें चालवीत आहेत तेव्हां त्यांच्या विद्वत्ता व बुद्धिमत्ता कसोटीस लागण्याचा हा प्रसंग आहे तो कसा साजरा होतो पाहू.

दुसरी परीक्षा या वर्षीं मास्तर लोकांची झाली, ती तर फार विलक्षण दिसते. इंग्लिश भाषा शिकविणाऱ्या ज्या मास्तर लोकांची म्याट्रिक्युलेशनची परिक्षा उतरली नसेल त्यांची परिक्षा घेतली जाईल म्हणून सर्क्युलर झालें होतें. पुढें दोन तीन प्रकारची निवड झाली असें ऐकतो. कोणाच्या परिक्षा घ्यावयास नकोत, कोणाच्या परीक्षा जागच्या जागीं परिक्षक येतील ते तेव्हां घेतील, व कोणाच्या परीक्षा अकोल्यास येऊन व्हावयाच्या, असे तीन प्रकार झाले. त्यांत अकोल्यास येऊन परिक्षा देणारांची याद्दीही बरीच होती असें ऐकत होतों पण गेल्या आठवड्यांत परिक्षा झाली ती पाहिली तीन सातच इसम बसले होते व त्यांतूनही कोणास कपाळदुखणा उठून ते परिक्षेंतून उठून गेले व बाकीच्यांस इंग्रजी व मराठा सोपेसे थोडें भाषांतर करावयास व एक पत्र लिहावयास सांगितलें. यांत परीक्षा म्हणण्या सारखें कांहीं झालें नाहीं. नाव मोठा समूह परिक्षेवाचून राहिला व परीक्षा दिलेल्यांत कांहीं पास व कांहीं नापास होतीलच व जागजागीं परीक्षा होणें आहेतच. व त्याशिवाय मेहेरबानीचा किंवा व्यक्त योग्यतेच्या मास्तराचा वर्ग वेगळा राहिलाच, असा सर्व प्रकार मनांत आणून पाहिला असतां ही छोटेखानी परिक्षा जी घेतली ती घेतली नसती तर कांहीं वावगें झालें नसतें, असें आम्हांस वाटतें, व कामावर रुजू असलेल्या मनुष्याकडून हें असलें परीक्षेचें नाजूक दिव्य उतरवून घेऊंही नये असें आम्ही मागें एकदां लिहिलें होतें तें या प्रसंगीं लोकांस अधिक सयुक्तिक दिसेल असें आम्हांस वाटतें.

---

### सूचना.

दिपवाळीचे सणाकरितां ४ दिवस कारखाना बंद राहिला व कित्येक नोकर बाहेरगावीं गेले ते शुक्रवारीं आल्या नंतर पत्रास सुरवात झाल्यानें तें तयार होण्यास उशीर लागला याबद्दल आश्रयदाते माफी देतील.

---

## वऱ्हाड

जळगांव येथें कांहीं ग्रामस्थ लोकांनीं एक नाटक तयार केलें आहे. व त्याचा एक खेळ झाला तो चांगला झाला असा वृत्त आम्हांस दोन पत्रें आलीं आहेत. एका लिहिणारानें कळविलें आहे कीं या नाटकवाल्यांस खेळापासून जी प्राप्ती होईल तिजवर ते एक स्वदेशीय कापडाचें दुकान काढणार आहेत. असें असल्यास हेतु बरा आहे.

—000—

मेहेरबान कमिशनर साहेब पश्चिम वऱ्हाड हे तपासणीकरितां मलकापुरास गेले होते ते शनवारीं परत आले. आतां येत्या आठवड्यांत वाशिमाकडे जाणार आहेत.

—000—

देऊळगावची यात्रा या वर्षी फार कमी भरली होती व देवाला उत्पन्न सुमार ३६००० रुपये झाले असे एकाने कळविले आहे. या यात्रेविषयी आमचे देऊळगावकर मित्र आम्हांस तपशील व सविस्तर हकीकत कळवितील तर बरें होईल.

—000—

कर्ना. बुलक साहेब डिपुटि कमिशनर प्रांतांत फिरावयास निघाले.

—000—

उमरावतीचे डिपुटि कमिशनर यांस युरोपियन लोकांच्या लग्नाचे रजिस्टर नेमिले.

—000—

निजामसरकारची रेलवे कलबुर्ग्यापासून हांदुरापर्यंत जानेवारीचे पहिले तारखेस सुरू होणार असें वर्तमान आहे.

—000—

निजामसरकारचे दिवाण सर सालरजंग साहेब लाहोरास गवरनर जनरल साहेबांचे दरबार होणार त्याकरितां तिकडे जाणार म्हणून इंग्रजीपत्रांत वर्तमान आहे.

—000—

अकोल्यात हायस्कुलाची प्रवेशपरीक्षा उद्या सुरू होईल. विद्यार्थी १०२ आले आहेत असें कळतें. उमरावतीच्या प्रवेशपरीक्षेकरितां ९४ विद्यार्थी आहेत.

—000—

मि० क्यांडी पश्चिमविद्यालयाचे अक्टिंग डायरेक्टर हे डाक्टर सिंक्लेर साहेब विलायतेहून आल्यावर रिकामे होणार, त्यास सातार्‍यास असिस्टंट कलेक्टरची जागा मिळणार असें वर्तमान आहे.

—000—

मि० कारनाक साहेब वऱ्हाडचे काटन कमिशनर यांजवर पैशाच्या संबंधानें कांहीं मोठा आरोप येऊन ते सस्पेंडही झाले होते परंतु हिंदुस्थान सरकारानें अंतस्थपणें त्याची चौकशी करून कारनाक साहेब यांस सक्त ताकीद दिली व पुन्हा कामावर त्यांस रुजू केलें. नेटिवांविषयींही सरकार असें करित जाईल तर त्याची कीर्ती निष्कलंक राहील.

—000—

उमरावतीच्या हायस्कुलावरील हेडमास्तर रा. रा. श्रीराम भिकाजी जटार बि. ए. हे रविवारचे सुटींत मित्रमंडळीस भेटावयाकरितां एथें आले आहेत.

—000—

एलिचपुर—एथील म्युनिसिपालिटीचे म्यानेजिंग कमिटीमध्यें मेहेरबान लक्षुमण बाळाराम तहशिलदार, रा० रा० वामन गणेश हे० ए० ह०, व मि० महमद नियाज मेंबर, व रा० रा० भगवंतराव बापू देशपांडे आनररी माजिस्ट्रेट यांस चेअरमन नेमिल्याचें कळतें. प्र. सिं.

—000—

वऱ्हाडचा चालू सालच्या एप्रिल, में, व जून या तीन महिन्यांचा जमाखर्चाचा हिशेब रेसिडेन्सीगाईटमध्यें छापून प्रसिद्ध झाला आहे. त्यांतील ठोकळ रकमा येणेंप्रमाणें आहेत.

| जमा | रु. |
|---|---|
| ल्यांड रिविन्यु ( जमीनबाब ) | १७४२८४ |
| फारिस्ट ( जंगल ) | ६३८१० |
| अबकारीवरील जकात | १९४४८८ |
| मीठ | ११७९६८ |
| स्टांप | ६०३२२ |
| कायदा आणि न्याय | ९२२१८ |
| पोलिस | ९१३१ |
| विद्या. | २७७२ |
| व्याज | ६३९ |
| किरकोळ | १५०८७ |
| लष्करसंबंधी | १९२१ |
| पब्लिक वर्क्स | १८०७ |
| पब्लिकवर्क्स स्टेटरेलवे | ० |
| | ——— |
| | ७३४०४७ |

खर्च

| | |
|---|---|
| फंडाची परत घेणी | ११५५१ |
| जमीन बाब | १५५८५२ |
| जंगल | ३६१०६ |
| मीठ | २०१३० |
| स्टांप. | ३००१ |
| कारभार व सार्वजनिक खातीं. | ५३८२९ |
| लहान खातीं. | १३५७२ |
| कायदा आणि न्याय. | ५०८०५ |
| पोलिस | १११२७८ |
| विद्या शास्त्र आणि कला. | ५२५८२ |
| धर्मसंबंधी | ३३१ |
| वैद्यक संबंधी. | १९०१९ |
| स्टेशनरी व छापणें | ८६०१ |
| तहाबरहुकूम नेमणुका. | ३६६६२ |
| किरकोळ. | ६२३२ |
| लष्करी पगार व नेमणुका. | ५१८९१२ |
| लष्करी इतर खर्च. | १४०६३६ |
| पब्लिक वर्क्स. | १८६७७६ |
| पब्लिकवर्क्स स्टेटरेलवे. | २४५२ |
| | ———— |
| | १४१९३२७ |

## वर्तमानसार

रशियाच्या बादशहानें खिवाचें संस्थान यांतील अमनदारी नदीच्या उत्तरेकडील टापू आपले राज्यास जोडला. व बंदोबस्ताकरितां तेथें फौजा ठेवून लष्करी गवरनर नेमिला असें कळतें.

कलकत्ता शहरांत व आसपास १५०० स्त्रिया घरच्या घरीं विद्याभ्यास करितात असें समजतें.

मि० एदलजी रुस्तमजी यांस मुंबईच्या म्युनिसिपलकमिटीचे असिस्टंट हेल्थ आफिसर नेमिलें.

मुंबईतील प्रसिद्ध गृहस्थ मि० बाळाजी पांडुरंग, मि० लखमीदास खेमजी, मि० खटाव माणकजी, मुरारजी गोकूळदास, व गंगाराम किशोरदास हे सार्‍या हिंदुस्थानांत देशपर्यटणाचे इरादानें फिरावयास निघणार आहेत.

रजपूत संस्थानांतील सर्जन मेजर मूर यांणीं हिंदुस्थानच्या हवेच्या संबंधानें जीं दुखणीं येतात त्यांवर घरगुती औषधें घ्यावयाचीं त्याविषयीं अनुभवानें एक पुस्तक केलें आहे. व हिंदुस्थान सरकारास तें पसंत होऊन त्यांणीं मूर साहेबास १००० रुपये बक्षीस दिले.

पंजाबांत मि० गेलवील नावाचे एक युरोपियन डिपुटी कमिशनर आहेत त्यांचें मन लाहोरच्या एका मुसलमान खानसाम्याचे मुलीवर आसक्त झाल्यामुळें तिशीं लग्न करण्याकरितां ते मुसलमान झाले. व त्यांणीं आपलें नाव शेख अबदुल रहमान असे ठेविलें. सरकारानें त्यांस असिस्टंट कमिशनर करून तेथून दिल्लीस पाठविलें व सस्पेंड केलें आहे.

आग्रा आणि भरतपूर यांचे दरम्यान रजपुताना स्टेट रेलवे, या आठवड्यांत सुरू होणार आहे.

रा. बा. लक्षण जगन्नाथ बेळगावचे डिपुटी कलेक्टर यांस खानदेशांत व खानदेशापैकीं मामलेदार रा. सा. काशिनाथ महादेव थत्ते यांस बेळगावास डिपुटी नेमण्याविषयीं मुंबई सरकारानें प्रसिद्ध केलें होतें. पण पुन्हां त्या नेमणुका रद्द केल्या. लक्ष्मणराव यांस बेळगावासच ठेऊन, खानदेशांत आनंदचे मामलेदार रा. सा. केशवलाल हिरालाल यांस अक्० हुजूर डिपुटी कलेक्टर नेमिले.

म्यांचेस्टर शहरांतील एका मोठ्या व्यापारी पेढीनें मुंबईच्या आपल्या अडत्यास माहिती विचारिली आहे कीं मुंबईस गिरण्या किती आहेत, त्यांतून सूत व कापड कसें निघतें व म्यांचेस्टर पेक्षां कोणत्या गुणांत तें हलकें आहे, सूत व कापड किती तयार होतें व तें कोणकोणते ठिकाणीं विक्रीस जातें तें कळवावें. ही माहिती मिळाल्यावर तिकडील जकात कमी किंवा माफ करवून घेण्याचा इरादा आहे असें म्हणतात.

फ्रान्स देशांत पुन्हां राजसत्तात्मक राज्य होण्याची फार घाटाघाट चालली आहे. कौंट आफ शांबो यास राजा करावा, असें बहुत लोकांचे मनांत आहे., व नोपाचेंही त्या गोष्टीकडे अंग आहे. लुईस नेपोलियनच्या पूर्वीं हे कौंट फ्रान्स, देशांत अमल चालवीत होते व हे राजकुटुंबांतील आहेत. यांचा रागन क्याथोलीक मताकडे भर आहे.

चीन देशांतील एक विजातीय उंच मनुष्य कलकत्त्याकडे आला आहे. त्याची उंची ८ फूट आहे.

नागपुरच्या श्रीमंत आनंदीबाई राणी साहेब यांच्या वर्षासनातून सालीना १५००० रुपये श्रीमंत जानोजीराव भोसले यांस देत जावें व बाकीची रकम इंग्रज सरकारचें सुमार साडेपांच लक्ष रुपये कर्ज देणें आहे त्याच्या फडींत घ्यावी असा ठराव झाला.

दक्षिण महाराष्ट्र देशांत धारवाडाकडे गेल्या आठवड्यांत पाऊस पडला.

बंगाल्याकडील कांहीं सिव्हिल सरवंट ब्रह्मदेशांत पाठविणार आहेत.

चीन देशचे बादशहा सन १८६१ सालीं मरण पावले. त्यांचे चिरंजीव अल्पवयी असल्यामुळें २ राण्या राज्य चालवीत होत्या. आतां चिरंजीव मोठे होऊन ते राज्यपदारूढ झाले. चीन देश हिंदुस्थानापेक्षां मोठा असून त्यांत लोकवस्ती सुमारें ३० कोटि आहे.

होळकर सरकारच्या इंदुरांतील सदर कोर्टाचे चीफ जस्टिस रा. रा. धोंडो मल्हार गरूड व जस्टिस रा. रा. विनायक जनार्दन कीर्तने यांचे तैनातीस सरकारांतून चोपदार मिळाले व उभयतांस सरकारांतून कांहीं बक्षीसही दिलीं.

हिंदुस्थानांतील इंग्रजसरकारच्या ताब्यांतील मुलखांत सन १८७२ सालांत महामारीच्या उपद्रवानें एकंदर १६६,४६८ मनुष्यें मेलीं असें कळतें.

कलकत्ता व मद्रास म्युनिसिपालिट्या—कलकत्ता म्युनिसिपालिटीचा खर्च २५०९००० रु० आहे व तिला १,४०,००,०००० रु० कर्ज आहे. मद्रास म्युनिसिपालिटीचें उत्पन्न ५,७१३४० रु० आणि तीस कर्ज १०,१९,२७० रु० आहे.

योग्य प्रतिबंध —लहान मुली कसबिणीच्या धंद्याकरितां तयार करण्याच्या नीच उद्योगास प्रतिबंध चांगला प्रकारें व्हावा म्हणून बंगाल सरकारानें नदानचे कमिशनर व मिदनापूरचे कामगार यांस हुकूम फरमाविला आहे असें कळतें. याप्रमाणें सर्वत्र बंदोबस्त होईल तर चांगलें.

सर सालरजंग व सर टी. माधवराव यांस आपण फिनान्स कमिटीपुढें साक्ष द्यावयास जावें काय म्हणून विचारल्यावरून आपणावर राज्यकारभाराचा भार आहे तो सोडून जाणें होणार नाहीं असें त्यांनीं कळविल्याचें आमच्या ऐकण्यांत आलें म्हणून बाँबेगेझेट कर्ते म्हणतात.

इं. प्र.

निफाडच्या पो. का. बगैरेस कैदी मारल्या बद्दल शिक्षा झाल्या त्याविषयीं वाचकांस माहीत आहेच, पो. कामगारांनीं बरेच दिवस झाले हाय कोर्टांत अपील केलें होतें. त्याचा निकाल ता. १५ मिनहू रोजीं होऊन सर्व आरोपितांस सोडून दिलें. व या खटल्यांत राव. रावजी धोंडदेव मामलेदार यांणीं जी चवकशी केली होती ती फार बरोबर केली असेंही ठरल्याचें पक्के आधारावरून समजतें.

ना. वृ.

मि. ए टी क्राफर्ड सी. एस, यांस स्टेट सेक्रेटरींनीं आणखी दोन महिन्यांची रजा दिली असें गेल्या सरकारी ग्याझेटांत छापलें आहे. यांच्या नावावरून हे क्राफर्ड साहेब मुंबईचे माजी म्युनिसिपल कमिशनरच असावे असें वाटतें व तेच असतील तर ते अद्याप रजेवर आहेत, त्याचें नाव अद्याप सनदींत आहे इत्यादि प्रकार पाहून मोठें नवल वाटतें. आह्मास वाटतें तेच हे असतील तर त्यास पुन्हां हिंदुस्थानांत चाकरीवर रुजू करण्यापूर्वीं, त्यांणीं मुंबई म्युनिसिपालिटींत जी उधळपट्टी केली तिची योग्य रीतीनें चवकशी करणें मुंबईसरकारास भाग आहे. तशी चवकशी न करितां सरकार जर त्यास चाकरीवर रुजू करील तर, पेशवाईंत ब्राम्हणास जशी माफळीक होती त्याचप्रमाणें हल्लीच्या राज्यांत इंग्रजांस आहे अशी जी लोकांची समजूत होत चालली आहे ती विशेष दृढतर होईल. अ. द.

काइरो येथें संप्रति उत्तम रेशीम पिकविण्याचा प्रयत्न चालला आहे. या कामांत तेथील मुख्य न्यायाधीश बाबू निकोबर मुकरती हे फार खटपट करीत आहेत. काइरोच्या महाराजांनीं या बद्दल बहुत बक्षीस देऊन त्यांचा पगार रु० १३०० होता तो २३०० केला तसेंच महाराज वेळोवेळीं उत्तम रेशीम तयार करणारासही कांहीं बक्षीस देत असतात. आपले दुसरे संस्थानिक व त्यांचे कारभारी आपल्या संस्थानांतील रयतेस कांहीं व्यापार शोधून काढून खास उत्तेजन देतील तर त्यांचीं संस्थानें भरभराटीस चढल्यावाचून राहणार नाहींत.

ज्या फ्रेंच गृहस्थानें सुएजची संयोगी भूमी फोडून आरपार समुद्र केला तो गृहस्थ रुस देशापासून हिंदुस्थानांत पेशावरपर्यंत आगगाडीचा रस्ता बांधण्याचा खटाटोप करित आहे.

या सालीं बडोद्यांतील दसऱ्याचा समारंभ सांगण्यासारखा झाला नाहीं असें एक बातमीदार लिहितो.

बडोद्याचे महाराज मल्हारराव हे आपलें आणखी एक लग्न करणार आहेत आणि नवीन होणाऱ्या सासऱ्याला त्यांणीं दसऱ्याच्या दिवशीं एक पालखी नजर केली असें समजतें.

प्रोफेसर दादाभाई नवरोजी यांस आपले दिवाणाची जागा द्यावी असें मल्हारराव गायकवाडाच्या मनांत येऊन त्यांनीं दादाभाईंस विलायतेस तार केली होती परंतु त्यांणीं तो हुद्दा पत्करणें नाकारिलें असें ज्यामिजमशेद लिहितो. सू. प.

**सरकारी कामदारांच्या नेमणुका.**

नामदार गवरनर इन कौन्सिल यांनीं रत्नागिरी जिल्ह्यांतील सबार्डिनेट जड्जांच्या बदल्या केल्या आहेत त्या येणें प्रमाणें;— रा० सा० रघुनाथ गणेश खारकर यांस चिपळून एथें से० क्ला० फ० ग्रे० सबा० जज्ज नेमलें.— रा. सा. गोपाळ अमृत यांस मालवण एथें से. क्ला. से. ग्रे. सबा. जज्ज नेमलें.—रा. सा. विश्वनाथ गोविंद चोळकर यांस संगमेश्वर एथें से. क्ला. थ—ग्रे. स. जज्ज नेमलें.

कलकत्त्यास मेडिकल कालेजांत मागें मारामारी झाली तींवरून विद्यार्थ्यांस शिक्षा झाल्या त्या येणेंप्रमाणें—२ नेटिव विद्यार्थ्यांस एक वर्षभर काढलें; ३ युरोपियन विद्यार्थ्यांपैकीं एकास एक वर्षपर्यंत काढलें व दोघांची कालेजसंबंधी सर्टिफिकेटें एक वर्षपर्यंत रद्द केलीं, २९ हास्पितल आप्रेन्टिसपैकीं दोघांस एक वर्षपर्यंत व दोघांस ६ महिन्यापर्यंत काढलें, २४ कालेजाच्या वाड्यांतून एक महिनाभर बाहेर जाण्याची बंदी केली व एकास मोठा टपका दिला.

निजामाचे दिवाण सर सालारजंग यांच्या मनांत आहे कीं ठिक ठिकाणीं बंकें किंवा पेढ्या स्थापाव्या.

कर्जाबद्दल कुळांस सावकारी तुरुंगांत ठेवण्याविषयीं जो कायदा आहे त्यांत कांहीं फेरफार होणार आहे.

जपानच्या बादशहानें दररोज निघणारें एक वर्तमानपत्र काढलें असून तें सर्वांनीं घेतलेंच पाहिजे असा हुकूम केला आहे. ज्ञा. द.

असें समजलें आहे कीं, सिंध एथील कमिशनर विलयातेस रजेवर जाणार तेव्हां त्यांचे जागेवर मे० हेवलाक साहेब रेव्हिन्यु आणि पोलिस कमिशनर प्रांत दक्षिण ह्यांची नेमणूक होणार व त्यांचे जागेवर मे० जे. ई. अलिफंड पुण्याचे कलेक्टर आणि माजिस्ट्रेट साहेब यांची नेमणूक होणार. ज्ञा. प्र.

मल्हारराव महाराज दुसरें लग्न करणार आहेत. वधूचें नाव लक्ष्मीबाई असून वय चवदा वर्षांचें आहे. लक्ष्मीबाईस एक लक्षाची नेमणूक करून देणार कोणी बळवंतराव भाऊस लक्ष्मीबाईचे कारभारी नेमले आहेत ह्मणतात. यांची नेमणूक सालीना २०००० रुपयांची झाली आहे.

मुंबई ग्याझेटावरून कळतें कीं, बंगाल्यांतील दार्जीलिंगच्या डोंगराजवळ उत्तम प्रकारच्या स्लेट जातीच्या दगडांची खाण सापडली आहे. ने. ओ.

रावबहादूर धोंडो कृष्ण कानिटकर हु. डे. कलेक्टर यांस जगलडी एथील कारभाऱ्याची जागा मिळाली. स. शो.

रावसाहेब रामचंद्र सखाराम डिस्ट्रिक्ट डिपुटी कलेक्टर बेळगाव हे पुनः आपले सोलापूर एथील मामलेदारीचे जागेवर येणार अशी लोकवार्ता ऐकण्यांत येते.

पंढरपूर एथील श्री विठोबाचे मंदिरांत यात्रेचे दिवसांत हवा कोंडली जाऊन खराब होते व तेणेंकरून यात्रेकरू लोकांचे शरीरप्रकृतीत अनेक प्रकारचे विकार उद्भवतात. ते न होण्याविषयीं विचार करण्या करितां सानिटरी कमिशनर साहेब मुंबईहून मुद्दाम पंढरपुरास येणार आहेत असें ऐकतों.

सोलापुरचे प्रसिद्ध व्यापारी धर्मराव थोवडे यांस दम्याचे आजारानें तारिख १९ रोजीं देवाज्ञा झाली. आ. बृ.

## लोअर स्टयांडर्ड परीक्षेंतील प्रश्न.

### दिवाणी शाखा.

१. अ नावाचा मनुष्य बुलढाणें जिल्ह्यांत ब वर दिवाणींत फिर्यादअर्ज दाखल करितो (ब) अकोलें जिल्ह्यांत राहतो. अची फिर्याद वाशीम जिल्ह्यांतील घराबद्दल आहे. बुलढाणें जिल्ह्यांत अनें फिर्याद दाखल केली त्या कोर्टांनीं एकदम फैसल करावी किंवा नाहीं व जर एकदम फैसल करू नये तर काय करावें.

२. दिवाणी मुकदम्यांत दस्ताऐवज हजर करण्याविषयीं काय नियम आहेत.

फिर्याद अर्जाबरोबर कोणते दस्तैवज हजर करावेत व फिर्यादीचे पुढील पर्यायांत कोणते दस्तैवज, हजर करितां येतात.

३. नमुन्याप्रमाणें समन्स न लिहितां नुसतें प्रतिवादीस पत्र लिहिलें असतां त्याचे बजावणी पुरता पुरावा कोणता ह्मणता येईल.

४. प्रतिवादी हजर असून वादी हजर नाहीं असे संबंधानें वादीचे, गैरहजीरींत त्याचे विरुद्ध फैसल केला असतां वादीस दुसरी फिर्याद त्याच दाव्याचे विषयाबद्दल करितां येते कीं नाहीं आणि फिर्याद करितां येत असेल तर काय शर्तींवर.

५. गैरहजीरीनें वादी विरुद्ध फैसल केला असेल अगर प्रतिवादीविरुद्ध एकतर्फी फैसल केला असेल तर असे फैसल रद्दित करण्याकरितां अर्ज करावयास किती मुदत आहे व ती कधींपासून मानली पाहिजे.

६. निरनिराळे वर्गाचे साक्षीदारांस पोटगी भत्ता देण्याचे दर काय आहेत. व समन्स करण्याबद्दल व वारंट करण्याबद्दल फी किती द्यावी लागते. व एक पक्षकार एकां गावचे पांच साक्षीदारांस समन्स करू इच्छित आहे त्यास त्याची कामगिरीची फी किती द्यावी लागेल.

७. एक हुकूमनामा तारीख १५ जुलई सन १८७१ इसवी रोजीं झाला आहे. त्यांतील वादीचे नाव (अ) आहे. अ आपले हुकूमनाम्याची बजावणी करण्याकरितां दरखास्त प्रथम जानेवारी सन १८७४ रोजीं देतो तर तो एकदम बजावतां येतो कीं नाहीं.

८. अनें आपली गाडीबैल बस भाड्यानें देऊन त्याचे ताब्यांत दिले आहेत [क] अवर पैशाबद्दल झालेल्या हुकूमनाम्यांत या गाडी बैलाची जप्ती व्हावी ह्मणून अर्ज करील तर ही जप्ती कोणत्या रीतीनें व्हावी.

९. हुकूमनाम्याचे बजावणींत जंगम व स्थावर मालाचे निरनिराळे विक्रीबद्दल जाहिरनामे व लोकांना विक्रीची माहिती कोणत्या प्रकारें कशी दिली पाहिजे.

१० लिलावांत खरेदी घेणारानीं लिलावाची रक्कम जंगम मिळकतीबद्दल व स्थावर मिळकतीबद्दल केव्हां व कशी दिली पाहिजे.

११. अचा बवर पांचशें रुपयाचा हुकूमनामा झाला आहे त्या हुकूमनाम्याचे फेडींत तो (ब) ची जिनगी जप्त करतो ती जप्ती केल्यानंतर (ब)वर कचे ३०० रुपयांबद्दल झालेल्या हुकूमनाम्याबद्दल (क) बची तीच मिळकत जप्त करून त्याप्रमाणें (ड)चा (ब)वर ७०० रुपये चा हुकूमनामा झाला आहे व [ड] ही (ब)ची तीच मिळकत जप्त करितो व त्या मिळकतीचा हरास होऊन ६०० रुपये उत्पन्न होतात. हे रुपये ६०० तिघा वादींस कसकसे वाटून द्यावेत.

१२ अचा अकोलें जिल्ह्यांतील कोर्टांत (ब) वर हुकूमनामा झाला आहे व (ब)ची कांहीं मिळकत कलकत्त्यास आहे तेथें आपला हुकूमनामा (ब) वजाऊ पाहतो तर कलकत्त्यास हुकूमनामा बजाऊन घेण्यास कायकाय तजविजी योजिल्या पाहिजेत.

### मुदतीचा आक्ट.

ज्या दाव्याचे कारणाची मुदत तारिख १५ जानेवारी सन १८७३ इसवी रोजीं संपते त्या दाव्याचे कारणाबद्दल (अ) नें स्मालकाज कोर्टांत तारिख १ ज्यानेवारी सन १८७३ इसवी रोजीं फिर्याद केली. तारिख २० ज्यानेवारी सन मजकूररोजीं स्मालकाज कोर्टानें आपले अधिकारांत नाहीं ह्मणून दावा काढला व तारिख ३१ ज्यानेवारी रोजीं योग्य कोडतांत वादीनें दावा आणिला तर तारिख ३१ रोजीं दाखल केलेली फिर्याद मुदतींत आहे किंवा नाहीं?

२. तारिख १ ज्यानेवारी सन १८६० रोजीं अनें बस रोखा लिहून दिला व तो नोंदूनही दिला व तारिख १ ज्यानेवारी सन १८६५ रोजीं[ब]अस एक पत्र लिहितो त्यांत पैसा देण्याचें कबूल करितो. या कर्जाबद्दल फिर्याद कोणत्या तारखेपर्यंत करितां येते.

३. नोंदलेल्या रोखावरून अ बवर तारिख १ ज्यानेवारी सन १८७४ रोजीं फिर्याद करितो. रोख्याची तारिख १ ज्यानेवारी सन १८६८ आहे व नंतर तारिख १ फेब्रुवारी सन १८७४ रोजीं कस दाव्यांत त्याच रोख्यावरून प्रतिवादींत दाखल करितो. कचे बाबतींत दावा मुदतीचे बाहेर आहे कीं नाहीं?

४. खालीं लिहिलेल्या फिर्यादीस मुदत काय आहे?

१. घराचे भाड्याबद्दल.

३. माल पोंचविणारावर माल पोंचविण्यास उशिर केल्याबद्दल.

३. पर राज्यांत मिळविलेल्या हुकूमनाम्यावर चालणाऱ्या फिर्यादीस.

४. वडिलोपार्जित काम मिळण्याबद्दल

५. गहाण घेणारावर जंगम गहाण माल परत घेण्याबद्दल.

६. प्रतिवादीचे सांगितल्यावरून प्रतिवादीनें केलेल्या कामाची मजूरी अमुक दिवसांत त्या मजुरीचा पैसा देऊं असा करार नसेल तेव्हां.

७. चोरी करून मिळविलेल्या जंगम मिळकतीबद्दल.

### पुराव्याचा आक्ट.

१. सूचक प्रश्न हक्कानें केव्हां विचारता येतो, कोडताचे परवानगीनें केव्हां विचारतां येतो, व कोडतानें अशा प्रकारची परवानगी कशी हकीकत असेल तेव्हां द्यावी.

### कराराचा आक्ट,

अला बचीं तीन देणीं आहेत.

१. पहिलें रुपये ५०० तारिख १ ज्यानेवारी सन १८६६ रोजीं खात्यांत निघालेल्या बाकीबद्दल आहेत व हें कर्ज वसूल करणें मुदतीच्या बाहेर गेलें आहे.

२. दुसरें कर्ज २०० आहे. ते तारिख १ ज्यानेवारी सन १८६५ चे नोंदलेल्या कर्जरोख्यावरून आहे.

३. रें कर्ज १०० रुपये तारिख १ ज्यानेवारी सन १८६९ चे चिठ्ठीवरून आहे.

अ तारिख १ जानेवारी सन १८७१ इसवी रोजीं ५०० रुपये बस देतो परंतु अमुकच कर्जाचे फेडींत मी हे रुपये दिले आहेत असें कांहीं तो सांगत नाहीं तर सावकार ब आपले मुदतीबाहेर गेलेल्या कर्जांत ती रक्कम वसूल घेऊ शकतो किंवा नाहीं.

### नोंदण्याचा आक्ट.

दस्तैवज झाल्या तारखेपासून किती दिवसांचे आंत तो नोंदण्यास आणिला पाहिजे.

२. कशी हकीकत असेल तेव्हां व कोठपर्यंत ती मुदत वाढवितां येते.

३. जी सर्व स्थावर मिळकत सबरजिस्टराचे हद्दींत नाहीं त्या स्थावर मिळकतीबद्दल दस्तैवज नोंदण्यास आणिला असतां सबरजिस्टर यांणीं काय तजवीज केली पाहिजे.

४. किती दिवसानंतर ज्यांस मालीक नाहींत असे दस्तैवज फाडून टाकितां येतात व फाडून टाकण्याचे बाबतींत अमुक दस्तैवज फाडू नये असे कांहीं आहे कीं काय.

### स्मालकाज कोर्टांचा आक्ट.

१. स्माल काज कोर्टांत चालण्याजोग्या कोणत्या फिर्यादी आहेत.

२. स्मालकाजकोडताचा कोणत्या कोकांवर अधिकार आहे.

३. स्माल काज कोर्टाचे हुकूमनामे स्थावर मिळकतीवर केव्हां व कसे बजावतां येतील.

हें पत्र अकोला एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा. छा. प्र.